web: http://navakal.org,
e-mail- info@navakal.org

वर्ष–९० | अंक–६८ | मुंबई | सोमवार १४ मे २०१२ | संपादक : सौ. जयश्री खाडिलकर-पांडे | पाने–८ | किंमत:₹ २

REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

एक चळवळ

## ९०वा वर्धापनदिन योजना! वाचकांना नम्र सूचना

दै.'**नवाकाळ**'च्या **९० व्या वर्धापनदिनानिमित्त** आकर्षक **९० पैठण्यांची योजना** आम्ही राबविली. यामध्ये आमच्या हजारो वाचकांनी सहभाग घेतला, त्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार! **मंगळवार १५ मे आणि बुधवार १६ मे रोजी** या स्पर्धेतील **९० भाग्यवान विजेत्यांची** यादी दै. '**नवाकाळ**'मधून जाहीर करण्यात येईल. त्यासोबत पैठणी वाटपाचा तपशील देखील प्रसिद्ध करण्यात येईल, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**– संपादक**

# शिकलगार टोळीच्या ७ दरोडेखोरांचा पोलिसांवर गोळीबार

## दोन पोलीस जखमी! दहिसरपासून विरारपर्यंत पोलिसांना पळविले

**विरार, ता. १३ – आज रविवारच्या भरदिवसा दहिसर ते विरारच्या मुंबई–अहमदाबाद महामार्गावर प्रचंड थरारनाट्य घडले. मध्य प्रदेशातील शिकलगार टोळीतील सात दरोडेखोरांना अटक करण्यासाठी दहीसर क्राईम ब्रँचच्या पथकाने चेकनाक्यावर फिल्डिंग लावली होती. मात्र, या फिल्डिंगला न जुमानता, या दरोडेखोरांनी आपला टेम्पो भरधाव पळवित थेट विरारच्या कातकरी पाड्यापर्यंत नेला. तोपर्यंत पोलीस त्यांचा पाठलाग करीत होते. त्यानंतर कातकरी पाड्यात जाऊन हे सात दरोडेखोर लपले. त्यांना शोधण्यासाठी पोलिसांनी झोपड्या–झोपड्यांमध्ये कोम्बिंग ऑपरेशन सुरू केले असता, या दरोडेखोरांनी पोलिसांवरच गोळीबार केला. या गोळीबारात पोलीस कॉन्स्टेबल बांगरे व दिलीप वराड हे जखमी झाले आहेत. दरोडेखोरांनी पोलिसांवर गोळीबार करताच, पोलिसांनीही त्यांच्यावर प्रतित्युत्तरादाखल गोळीबार केला. या गोळीबारात दरोडेखोर अमर सिंग याला गोळी लागली असून त्याच्यासह पाच दरोडेखोरांना पोलिसांनी जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून तलवारी, चॉपर, पहार, घरफोडीचे साहित्य व रिव्हॉल्व्हर असा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे.**

मध्य प्रदेशातील शिकलगार टोळीतील दरोडेखोर दरोडा टाकण्यासाठी शस्त्रांसह टेम्पोतून येणार असल्याची खबर मिळाल्याने दहिसर क्राईम ब्रँचच्या पोलिसांनी दहिसर चेक नाक्यावर कडेकोट बंदोबस्त ठेवून कुठचेही वाहन पळून जाऊ नये म्हणून बॅरिकेड ठेवले. सकाळी साडेनऊच्या सुमारास त्यांना हवा असणारा टेम्पो मुंबईकडून मिरारोडकडे येताना दिसला. पोलिसांनी हा टेम्पो अडविण्याचा प्रयत्न करताच, हा टेम्पो सुसाट वेगाने अहमदाबाद महामार्गावर धावू लागला. पोलिसांची व्हॅन या टेम्पोचा पाठलाग करीत होती. पोलिसांचा हा पाठलाग पाहून दरोडेखोरांनी आपला टेम्पो विरार फाट्यावरून चंदनसार रोडवर वळविला. तेथेही पोलिसांनी पाठलाग सुरू ठेवल्याने शिकलगार टोळीतील दरोडेखोर अमरसिंग, मंगलसिंग, पिंकीसिंग, जालंदरसिंग, संजू, राधेसिंग, सिंधूसिंग हे कातकरी पाड्यातील झोपडपट्टीत शिरले. कातकरीपाडा हा दरोडेखोरांचे लपण्याचे हमखास ठिकाण आहे. त्यावेळी दुपारचे साडेबारा वाजले होते.

या सात दरोडेखोरांना शोधण्यासाठी पोलिसांनी पोलीस उपनिरीक्षक शंकर खटके यांच्या नेतृत्वाखाली कोंम्बिग ऑपरेशन सुरू केले. पोलीस आपल्याला पकडणार, असे दिसताच दरोडेखोरांनी पोलिसांवर गोळीबार केला. या गोळीबारात पोलीस कॉन्स्टेबल बांगरे व दिलीप वऱ्हाड हे जखमी झाले. पोलीस जखमी होताच संतप्त पोलिसांनी दरोडेखोरांवर जोरदार गोळीबार केला. त्यात दरोडेखोर अमरसिंग हा जखमी झाला. त्यानंतर एक दरोडेखोर टेम्पो घेऊन पळाला. मात्र, टेम्पो निघून गेल्याने उरलेल्या पाच दरोडेखोरांना पळण्यास कुठचेही वाहन उपलब्ध नसल्याने त्यांनी पोलिसांसमोर शरणागती पत्करली. या सर्वांना विरार येथे नेण्यात आले असून जखमी दरोडेखोर अमरसिंग व पोलीस कॉन्स्टेबल बांगरे व वऱ्हाडे यांना विरारच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. शिकलगार टोळीच्या या गोळीबाराने पोलीस दल मात्र पार हादरले आहे.

# कर्नाटकात भाजपा सरकार संकटात

## येडियुरप्पा समर्थक ७ मंत्र्यांचे राजीनामे



बंगळूर, ता.१३– कर्नाटकातील भाजपामध्ये प्रचंड बंडाळी माजली असून कर्नाटकातील भाजपा सरकार संकटात सापडले आहे. कर्नाटकचे भाजपाचे माजी मुख्यमंत्री बी.एस. येडियुरप्पा यांनी सध्याचे भाजपाचे मुख्यमंत्री सदानंद गौडा यांना आव्हान दिले आहे. येडियुरप्पा यांचे समर्थक असलेल्या ७ मंत्र्यांनी आपल्या मंत्रिपदाचे राजीनामे सदानंद गौडा यांच्याकडे सोपविले आहेत. आणखी दोन समर्थक मंत्री उद्या सोमवारी आपल्या मंत्रिपदाचे राजीनामे देणार आहेत. येडियुरप्पा यांचे ४० समर्थक आमदार व मंत्री आपल्या आमदारकीचा राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळेच कर्नाटकातील भाजपा सरकारला घरघर लागली आहे.

न्यायालयाने आपल्याला भ्रष्टाचाराच्या सर्व आरोपातून मुक्त केले असून आता आपल्याला पुन्हा मुख्यमंत्रीपद द्या, ही बी.एस्. येडियुरप्पा यांची मागणी पूर्ण होत नाही म्हणून त्यांच्या समर्थक मंत्र्यांनी हे बंड पुकारले आहे. कृषिमंत्री उमेश कत्ती, ऊर्जामंत्री शोभा करंदजाले, पाटबंधारे मंत्री बसवराज बोम्मई, सार्वजनिक बांधकाम मंत्री सी.एस्. उदासी, उद्योगमंत्री मुरूगेश निराणी, गृहनिर्माण मंत्री व्ही.सोमण्णा, अबकारी मंत्री एस्. पी. रेणुकाचार्य अशी या राजीनामा दिलेल्या मंत्र्यांची नावे आहेत. तर क्रीडामंत्री राजू गौडा व पशुसंगोपन मंत्री रेवू नायक बेळमगी हे मंत्री सोमवारी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देणार आहेत. कर्नाटकातील हा तिढा कसा सोडवायचा? हा प्रश्न आता पक्षाध्यक्ष नितीन गडकरी यांना पडला आहे. त्यातच येडीयुरप्पा यांनी काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांची स्तुती केल्याने ते काँग्रेसच्या मार्गावर तर नाहीत ना? अशी भीती भाजपला वाटू लागली आहे.

## महामानव डॉ. आंबेडकर यांच्या कार्टुनबाबत सुनील कदम संतप्त

# खैरलांजीवेळी डेक्कन जाळल्यावरच लक्ष दिले

## दोन महिने कार्टुनची तक्रार होत होती! दखल का घेतली नाही

**(सौ. जयश्री खाडिलकर–पांडे)**

**ठाणे, ता. १३ – महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्टुन केंद्रीय अभ्यासक्रमाच्या अकरावीच्या क्रमिक पुस्तकाने प्रसिध्द झाल्याने आंबेडकरी जनता संतप्त झाली आहे. १९५० च्या दरम्यानचे कार्टुन आता क्रमिक पुस्तकात कशासाठी छापण्यात आले? असा परखड सवाल नॅशनल कॅम्पेन फॉर इक्वल अपॉर्च्युनिटीचे सुनील कदम यांनी विचारला आहे.**

'नवाकाळ'शी बोलताना सुनील कदम म्हणाले की, या पुस्तकाची जबाबदारी असलेले डॉ. सुहास पळशीकर यांना मी साधा प्रश्न विचारला की, या कार्टुनमुळे विद्यार्थ्यांना काय जास्त कळणार आहे? हे कार्टुन विद्यार्थ्यांसाठी चांगले का आहे? या दोन प्रश्नांची उत्तरे डॉ. पळशीकर समाधानकारक देऊ शकले नाहीत. म्हणून माझा सवाल आहे की, या कार्टुनचे काहीच साधत नाही तर हे कार्टुन क्रमिक पुस्तकात घेण्याचे कारणच काय? विचार स्वातंत्र्य आम्हीही मानतो. पण या स्वातंत्र्याबरोबर जबाबदारीची भावना असायला हवी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला जातो. किंबहुना छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्रातील आपले संत यांच्याबद्दल बोलताना, लिहिताना जबाबदारीने लिहिले पाहिजे. मोठ्या व्यक्तिमत्त्वांचा अपप्रचार करणे ही धोकादायक वाटचाल आहे आणि हे थांबवलेच पाहिजे.

सुनील कदम म्हणाले की, कार्टुन चित्राचा मनावर प्रभाव मोठा असतो या पूर्ण जाणिवेनेच कार्टुन वापरले पाहिजे. क्रमिक पुस्तकात जे कार्टुन आहे त्याच्याशेजारी त्याबाबत जी माहिती दिली आहे. ती अगदीच तोकडी आहे. काँग्रेस आणि डॉ. आंबेडकर यांच्यात घटना निर्मितीवेळी मतभेद होते. इतकात त्यातून उलगडा होतो. त्या काळात जे जे घडले त्याची संपूर्ण माहिती द्यायला हवी होती. तसे न करता मोघम माहिती देऊन असे कार्टुन छापल्याने अकरावीच्या विद्यार्थ्यांचे डॉ. आंबेडकर यांच्याविषयी काय मत होईल? पुढील मजकूर पान ८ वर

### पांजरापोळ प्रकल्पग्रस्तांची ३० कुटुंबे प्रखर उन्हात रस्त्यावर

# झाडावर चढून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेला लेखी आश्वासन देऊन फसविले

(शंकर कडव यांजकडून)



**मुंबई, रविवार – चेंबूरच्या आणिक पांजरापोळ जोडरस्ता प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. मात्र, या प्रकल्पात बाधित झालेल्या शेकडो कुटुंबाच्या घरावर एमएमआरडीएने जबरदस्तीने बुलडोझर फिरवून बेघर केले आहे. पुनर्वसनाच्या मागणीसाठी या प्रकल्पग्रस्तांनी अनेकदा मोर्चे, उपोषण, आंदोलने केली. धक्कादायक बाब अशी की, २० दिवसांपूर्वी एका महिलेने तिची झोपडी तोडण्यासाठी आलेल्या पथकासमोरच झाडावर चढून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पथकातील अधिकाऱ्यांनी या महिलेला २ दिवसांत पुनर्वसन करण्याचे लेखी आश्वासन दिले. मात्र, आजतागायत या महिलेसह ३० कुटुंबे उघड्यावर भरउन्हात तळपत रस्त्याशेजारी आपले जीवन जगत आहेत.**

गेल्या काही वर्षांपासून पांजरापोळ नागरिक एकता समितीचे संस्थापक अध्यक्ष लाजरस ठोंबे यांनी एमएमआरडीए प्रशासनाशी एकजुटीने लढा दिल्यामुळे आतापर्यंत या प्रकल्पातील ३२५० झोपडीधारकांचे पुनर्वसन करून त्यांना घराचा ताबा देण्यात आला. मात्र, उर्वरित ४०० झोपडीधारकांचे अजून पुनर्वसनच झालेले नाही. हे झोपडीधारक परिसरातील मिळेल त्या झोपडीत भाड्याने राहात आहेत. ४०० पैकी १४० झोपडीधारकांनी मुंबई उच्च न्यायालयात तर २०० पुढील मजकूर पान ८ वर

## टीएमटीसाठी आमदार एकनाथ शिंदेही सरसावले

# २४ कोटी रुपयांचा निधी देणार! चांगले अधिकारी आणणार टीएमटीमध्ये बुरपुल्लेंना आणा! कृती समिती लढा देणार

ठाणे, ता. १३ – ठाणे महापालिका परिवहन सेवेला सक्षम करण्यासाठी टीएमटी बचाव कृती समितीचा लढा सुरू झालेला आहे. या समितीने आज शिवसेना ठाणे जिल्हा संपर्कप्रमुख आमदार एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन परिवहन सेवेबाबतची सर्व परिस्थिती कथन केली. परिवहन सेवा वाचविण्यासाठी आम्हीही प्रयत्नशील आहोत, त्यामुळे येत्या महिन्याभरात परिवहन सेवेच्या सर्व नादुरुस्त बसेस दुरुस्त करून रस्त्यावर आणणे, महापालिका प्रशासनाने मंजूर केलेला १८ कोटी रुपयांचा निधी वाढवून तो २४ कोटी रुपयांवर नेणे आणि परिवहन सेवा कायमस्वरूपी चांगली राहावी यासाठी सर्व अत्यावश्यक बाबींची पूर्तता करण्याचे आश्वासन आमदार पुढील मजकूर पान ८ वर

अशोक बुरपुल्ले हे सध्या ठाणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त पदावर कार्यरत आहेत. त्यांच्याकडे मुंब्रा येथील अतिक्रमण विभागाचा कार्यभार आहे. हेच बुरपुल्ले मागील वर्षी टीएमटीमध्ये कार्यरत असताना टीएमटीचे दिवसाचे १७ लाखांचे उत्पन्न योग्य नियोजन करून २३ लाख रुपयांवर नेले होते. त्यामुळे सर्वच कामगारांमध्ये बुरपुल्ले यांची लोकप्रियता वाढली. मात्र, बुरपुल्ले यांना आयुक्तांनी मुंब्रा येथे धाडल्यानंतर टीएमटीची गाडी पुन्हा घसरली त्यामुळे अशोक बुरपुल्लेंना पुन्हा टीएमटीमध्ये आणा ही सर्व कर्मचाऱ्यांची आणि लोकप्रतिनिधींची मागणी आहे. अशोक बुरपुल्ले यांना टीएमटीत पाठवून त्यांच्या सोबतीला सक्षम अधिकारी द्या, अशी मागणी होत आहे.

# भारतीय संसदेला ६० वर्षे पूर्ण

## नेत्यांची व्यंगचित्रे पाठ्यपुस्तकातून काढण्याचा निर्णय

नवी दिल्ली, ता. १३– जगातील सर्वांत मोठ्या देशाची लोकशाही म्हणून गौरव होत असलेल्या भारताच्या संसदेला आज ६० वर्षे पूर्ण होत असल्याने आज संसदेचे विशेष संयुक्त अधिवेशन बोलावले होते. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्यापासून सोनिया गांधी, लालकृष्ण अडवाणी, शरद पवार अशा दिग्गजांनी भारतीय लोकशाहीच्या समृद्ध परंपरेचे गोडवे गायले. त्याचप्रमाणे भारतीय संसदेच्या पाया ज्यांच्या राज्य घटनेने घातला त्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यंगचित्रामुळे निर्माण झालेल्या वादंगाच्या पार्श्वभूमिवर यापुढे कुठच्याही नेत्याचे व्यंगचित्र पाठ्यपुस्तकात छापले जाणार नाहीत व जी व्यंगचित्रे आहेत ती वगळली जातील, असा एकमुखी निर्णय घेण्यात आली. भारताची लोकशाही परिपूर्ण व समृद्ध करण्यात सामान्य जनतेचाच सर्वांत मोठा वाटा असल्याचे सर्वच नेत्यांनी मान्य केले. यापुढे संसदेचे कामकाज वर्षातून किमान १०० दिवस तरी चालावे, अशी मागणी करण्यात आली.

**शुभराशी–३,४,७**






# डोंबिवली पश्चिमेतील नगरसेविका मनिषा धात्रक यांचा विकासकामांचा धडाका

डोंबिवली, ता. १३- कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवली पश्चिमेतील प्रभाग क्रमांक ८३ एव्हरेस्ट सोसायटी प्रभागाच्या भाजपाच्या नगरसेविका मनिषा धात्रक यांनी गेल्या दीड वर्षांच्या नगरसेविका पदाच्या कालावधीत विकासकामांचा धडाका लावला असून विविध लोकोपयोगी विकासकामे पूर्ण केली आहेत. त्यामुळे त्यांच्या कामाविषयी नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

डोंबिवलीच्या खाऊ गल्लीत ज्येष्ठ नागरिकांसाठी आसनाची व्यवस्था व मोफत वृत्तपत्र वाचनालयाची सोय सुरू केली आहे. डोंबिवली स्टेशन ते विष्णूनगर पोस्ट ऑफिसदरम्यान फेरीवाल्यांचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत होता. या समस्येवर मात करण्यासाठी हा परिसर 'ना फेरीवाला क्षेत्र' म्हणून घोषित करून घेतला. त्यामुळे पादचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. नवरे कंपाऊंडमधील कचरा कुंडीनी बुजलेल्या विहिरीला पुन्हा पुनर्जिवित केले. त्यामुळे आज त्या



विहिरीला पाणी आहे. घनःश्याम गुप्ते रोडवरील एलोरा सोसायटी ते गोमांतक बेकरी रस्त्याचे रुंदीकरण करून घेतले आहे. घनःश्याम गुप्ते रोडवरील नाला हा सहा फुटी सिमेंटचे स्लिपर्स टाकून बंदिस्त केला आहे. रेल्वे स्टेशन परिसरातील फेरीवाले हटविण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करून कारवाई करण्यास भाग पाडले आहे. 'ह' प्रभागातील बेकायदा बांधकामाच्या विरोधात वारंवार आवाज उठवत कारवाईकरीता विधिमंडळामार्फत आवाज उठविला. भ्रष्टाचाराविरोधात आंदोलनाचे लोकनायक ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी डोंबिवली शहरात एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले आहे. या विविध लोकापयोगी कार्यक्रमामुळे धात्रक यांच्या कार्याविषयी जनमानसातील शाबासकीची थाप मिळत आहे. लोकोपयोगी कामे करण्याचा वसा घेतलेल्या मनिषा धात्रक यांनी या पुढेही कामाचा पाठपुरावा सतत सुरू ठेवण्याचा निर्धार केला आहे. नगरसेविका मनिषा धात्रक यांचे पती श्री. शैलेश धात्रक हे भारतीय जनता पक्षाचे कल्याण जिल्हा उपाध्यक्ष असून समाजकारण आणि राजकारणात सक्रीय आहे. मनिषा धात्रक यांनी त्यांच्याकडूनच राजकीय वारसा घेतला आहे. धात्रक दांम्पत्य राजकारणार येण्यापूर्वी मागील अनेक कालावधीपासून सामाजिक व शैक्षणिक कामे करीत आहेत.

## दारूच्या नशेत गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

नांदेड, ता. १३ - घरी कोणी नसल्याच्या संधीचा फायदा घेऊन हदगांव तालुक्यातील मौजे वडगांव (बु.) येथील एका तरुणाने दारू पिऊन पिंपळाच्या झाडाला दस्तीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना आज दुपारी घडली आहे.

हदगांव तालुक्यातील मौजे वडगांव (बु.) येथील बबन खंडू कांबळे (३२) या तरुणाने ११ मे रोजी घरी कोणी नसल्याची संधी साधून दारूच्या नशेतच घरासमोर असलेल्या पिंपळाच्या झाडावर चढून स्वतःच्या खांद्यावर असलेल्या दस्तीने गळफास घेऊन मरण पावला. याप्रकरणी अविनाश खंडू कांबळे याने दिलेल्या माहितीवरून तामसा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# अवकाळी पावसाने कराड तालुक्यात लाखोंचे नुकसान

कराड, ता. १३ - कराड तालुक्यात अवकाळी पण वादळी पावसामुळे ठिकठिकाणी घरांवरील पत्रे उडून मोठे नुकसान झाले आहे. बेलवडे बु., कालवडे, काले, कोर्टी आदी ठिकाणी घरावरील पत्रे उडून सुमारे २ लाख ५५ हजार ८०० रुपयांचे नुकसान झाल्याचे पंचनामे करण्यात आले आहेत. तरीही शासकीय निकषानुसार त्या दिवशी ६० मि. मी. पेक्षा अधिक पाऊस झाला नसल्याने नुकसानग्रस्तांना नुकसानभरपाई मिळणार का, याबाबत साशंकता व्यक्त होत आहे. दरम्यान, एकीकडे अवकाळी पाऊस तर दुसरीकडे उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून शेतीसह पिण्याच्या पाण्याची अवस्थाही बिट होत चालली आहे. कराड तालुक्यातील ५८ पाझर तलावापैकी ९ पाझर तलावात केवळ २० टक्के इतका पाणीसाठा शिल्लक आहे. बाकी सर्व तलाव कोरडे ठणठणीत पडले आहेत.

गेल्या आठ दिवसांपासून कराड तालुक्यात वादळी पाऊस हजेरी लावत आहे. वादळी वाऱ्यासह कोसळणाऱ्या या पावसामुळे घरांवरील पत्रे उडून जाण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत असल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कालवडे येथील ताईआई मंदिरावरील तर स्मशानभूमीवरील पत्रे उडून तसेच अनेकांच्या घरांवरील पत्रे उडून हजारो रुपयांचे नुकसान झाले. काले येथेही अनेकांच्या घरांवरील पत्रे उडून हजारो रुपयांचे नुकसान झाल्याची नोंद करण्यात आली आहे. तसेच बेलवडे बु.व कोर्टी येथील लोकांच्या घरांवरील पत्रे उडून असे एकूण २ लाख ५५ हजार ८०० रुपयांचे नुकसान झाल्याचे पंचनाम्यानुसार समोर आले आहे.

# वाका येथे ८ हजाराची चोरी

नांदेड, ता. १३ - ॲटो चालकाने आपल्या ताब्यातील वाहन घराचे बाजूला उभा केला असता ऑटोच्या डिकीतील ८ हजार रुपये व कागदपत्र दोघाजणांनी चोरून घेतल्याची घटना वाका येथे घडली. फिर्यादी श्यामराव मुंकीदा वन्ने रा.वाका याने रात्री आपला ऑटो क्रं.एम.एच. २६ जी ३१७७ हे वाहन वाका येथील त्यांचे घराचे बाजूला उभा करून ॲटोच्या डिक्कीमध्ये नगदी ८ हजार रुपये व ॲटोचे मुळ कागदपत्र टेकून कुलूप लावलाअसता आरोपी मनोहर अप्पाराव हंबर्डे, ज्ञानेश्वर गोविंद चौंडेकर दोघे रा. वाका यांनी चोरुन नेले. या प्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी विरुध्द उस्माननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास इजळकर हे करीत आहेत.

## १०हजाराच्यासोन्याच्या मोरण्या चोरीस

नांदेड, ता. १३ -सराफा दुकानदाराने आपले दुकान बंद करून घरी गेला असता अज्ञात चोरट्याने दुकानाचे कुलूप तोडून शटर वाकवून आत प्रवेश करून दुकानातील १० हजार ५०० रुपयाच्या सोन्याच्या मोरण्या चोरुन नेल्याची घटना विकासनगर जुना कौठा येथे घडली. फिर्यादी ज्ञानेश्वर व्यंकटराव कौठैकर रा. विकासनगर जुना कौठा याने विकासनगर येथील आपले सराफा दुकान बंद करून घरी गेले असता अज्ञात चोरट्यांनी सराफा दुकानाचे कुलूप हे लोखंडी टिकासीने तोडून शटर वाकवून आत प्रवेश करुन दुकानातील १० हजार ५०० रुपयांच्या सोन्याच्या मोरण्या चोरुन नेले. याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# ट्रॅक्टरखाली चेंगरुन एक ठार तर एक जखमी

नांदेड, ता. १३ - धर्माबाद तालुक्यातील जारीकोट शिवारात असलेल्या तळ्याच्या पाळूवर ट्रॅक्टर चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर हयगयीने व निष्काळजीपणे चालविल्यामुळे ट्रॅक्टर पलटी होऊन त्याच्या सोबत बाजूला बसलेला ड्रायव्हर गंभीर जखमी होऊन मरण पावला आहे.

हनमंत चांदू डुमणे व सय्यद जलील सय्यद मकबुल (२५) हे दोघे ११ मे रोजी ट्रॅक्टरच्या हेडवर बसून धर्माबाद तालुक्यातील जारीकोट शिवारात असलेल्या तळ्याच्या पाळूवरुन जात असताना हनमंत चांदू डुमणे याने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर हयगयीने, निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालविल्यामुळे ट्रॅक्टर पटली झाला. यात सय्यद जलील सय्यद मकबुल हा ट्रॅक्टरखाली चेंगरला गेल्याने तो जागीच मरण पावला तर हनमंत चांदू डुमणे हा स्वतःही जखमी झाला आहे. अफसानाबेगम सय्यद जलील यांनी दिलेल्या तक्रारीवरुन ट्रॅक्टर चालकाविरुद्ध धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सपोनि. गायकवाड या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

# कारने उडवल्याने दोन ठार! पादचाऱ्यांवर काळाचा घाला

कराड, ता. १२ - पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील साताराजवळील जोशी विहिर येथे कारने ठोकारून झालेल्या अपघातात दोन वृध्द जागीच ठार झाले.ही धडक एवढी भीषण होती की दोघेही पादचारी सुमारे १५ फ ूट हवेत उडाले होते.दरम्यान,याप्रकरणी भुईंज पोलीसांनी चालकाला ताब्यात घेतले आहे. सुलाबाई गुलाबराव जाधव (७५, रा.व्याहळी पुनर्वसन) व बबन शंकर मोने (७२ रा. गोंधळावाडी, आसले ता. वाई) अशी मृत झालेल्या दोघांची नावे आहेत.

सुमारास वाई बाजूकडील आरती मंगल कार्यालयाकडे जाण्यासाठी दोघे वृध्द रस्ता ओलंडत होते.त्यावेळी पुण्याच्या दिशेकडून सातारकडे अल्टो कार (एम.एच.०६ ए.एफ.७७७१)निघाली होती.दोन्ही वृध्द रस्ता ओलांडत असताना संबंधित कार जोशी विहिर येथे आली असता कारची दोघा वृध्दांना जोरदार धडक बसली.ही धडक एवढी भीषण होती की दोघेही सुमारे १५ फूट हवेत उडून गाडीच्या काचेवर जोरदार आदळले.अपघातात दोघांनाही डोक्यासह शरीराच्या बहुतेक भागाला जोरदार मार बसल्याने रक्ताच्या थारोळ्यात ते पडले. अपघातानंतर जखमींना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. म त्र,उपचारापूर्वीच दोन्ही वृध्दांचा मृत्यू झत्तला असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले. सुलाबाई जाधव व बबन मोने हे दोघे ओळखीच्या लग्नानिमित्त निघाले होते.या घटनेमुळै परिसरात हळहळ व्यक्त होत होती.

# येवल्यात टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा उत्साहात

येवला, ता. १३ - येथील सांक्तीक कला व क्रिडा मंडळ आयोजित कै.राजेंद्र दिनकराव शिंदे स्मृर्ती चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा स्वामी मुक्तानंद विघालयाच्या पटांगणावर घेण्यात आल्या प्रथम पारितोषीक ५१ हजार, नगरसेवक सुनिल काबरा व जागृती कला क्रिडा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने ठेवण्यात आले होते. तर द्वितीय पारितोषीक ३१ हजार रूपये नगरसेवक संजय कासार व रविंद्र भदाणे यांच्या वतीने ठेवण्यात आले होते. तृतिय पारितोषीक १५ हजार, विष्णूपंत कऱ्हेकर, येवला जेसिज सदस्य यांच्या तर्फे ठेवण्यात आले होते.

स्पर्धेचे अंतिम सामना आर.सी.सी क्रिकेट क्लब नाशिक व फैजान क्रिकेट क्लब येवला यांच्यात झाला त्यात आर.सी.सी, क्रिकेट क्लब नाशिक या संघाने विजेतेपद मिळविले तर फैजान क्रिकेट क्लबला उपविजेते पदावर समाधान म ानावा लागले. तसेच तृतिय पारितोषीक येवला येथील इंडिपेडंस क्रिकेट क्लबला मिळाले सदर स्पर्धेत बिना फीचे महाराष्ट्रातील अहमदनगर, दौंड, औरंगाबाद, पूना, धुळे, मालेगाव, नाशिक, सांगली, जळगाव आदी ठिकाणच्या संघानी सहभाग घेतला. सर्व सामने अंतराष्ट्रीय क्रिकेट नियमानुसार खेळवले गेले. विजेत्या संघास माजी नगराध्यक्ष दिनकराव पाटील व जिल्हा बँकेचे संचालक ॲड. माणिकराव शिंदे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या प्रसंगी नगरसेवक सुनिल काबरा, संजय कासार, सुनिल शिंदे, चेतनदादा कोळस, रविंद्र भदाणे, विष्णूपंत कऱ्हेकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

# अवैध कामांना विरोध करण्याची सिंधुदुर्गवासियांची ख्याती मंत्रालयापर्यंत

सिंधुदुर्ग, ता.१३- सिंधुदुर्गवासीय नियमांचे पक्के असून ते कोणतेही अवैध काम करीत नाहीत अन् दुसऱ्याला करू देत नाहीत, ही त्यांची ख्याती मंत्रालयापर्यंत पोहचल्याचे गौरवोद्गार ग्रामविकास आणि जलसंधारण खात्याचे प्रधान सचिव सुधीर ठाकरे यांनी सिंधुदुर्गनगरी येथे अधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभात बोलताना काढले.

सुधीर ठाकरे यांचा सत्कार सिंधुदुर्ग जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश बकोरिया यांनी केला.

**संग्राममध्ये सिंधुदुर्ग 'अव्वल' स्थानी**

शासनाच्या 'संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र' म्हणजेच 'संग्राम' या कार्यक्रमात राज्यातील तीन जिल्ह्यांच्या क्रमवारीत सिंधुदुर्ग जिल्हा प्रथम स्थानावर असून याबद्दल शासनाचे एक लाख रुपयांचे पारितोषिक दिले जाणार असल्याचे प्रधान सचिव सुधीर ठाकरे यांनी सांगितले.

ठाकरे यांनी धामापूर येथील श्री देवी भगवती मंदिराला भेट देऊन त्या ठिकाणच्या पर्यटन विकासासंदर्भात विविध कामांची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी आंगणेवाडीची श्री देवी भराडी देवीचे दर्शन घेतले. धामापूर येथील श्री देवी भगवती मंदिर आणि आंगणेवाडी येथील श्री देवी भराडीमातेच्या मंदिर स्थळांना तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत शासनाकडून सुमारे २ कोटी रुपये मिळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना सचिव ठाकरे यांनी केली. त्यांनी तारकर्ली, चौके भागाचा दौरा केला.

## कोळंबवाडीत एकाचा झोपेतच मृत्यू

सिंधुदुर्ग, ता.१३- कलंबिस्त कोळंबवाडी येथील अविनाश सहदेव सावंत (४५) हे आपल्या सालईवाडा येथील राहत्या घरात झोपलेल्या अवस्थेत मृतावस्थेत आढळून आले. याबाबतची खबर रवी शांताराम सावंत याने सावंतवाडी पोलिसात दिली आहे. सकाळी ६ वाजताच्या पूर्वी अविनाश सावंत हे सालईवाडा येथील घरात झोपलेल्या अवस्थेत आढळून आल्याने त्यांना सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असता ते मयत झाल्याचे रुग्णालय सुत्रांनी सांगितले. सावंतवाडी पोलिसांनी आकस्मित मृत्यू म्हणून नोंद केली आहे.



## घडलंय बिघडलंय

# अखेर बाल्कनी उघडली

रिॲलिटी शोचा प्रस्थ छोट्या पडद्यावर एवढा वाढलेला आहे की त्याचा परिणाम चित्रपट, नाटकावर व्हायला लागलेला आहे. काही वर्षापूर्वी दिवसाला तीन अशी नाटके सादर केली जात होती. आता ही संख्या फक्त एकावर आलेली आहे. बऱ्याच वेळा नाटकेही सादर केली जातात. जो काही प्रेक्षकवर्ग गर्दी करतो तो याच वेळेला. याचा अर्थ सगळीच नाटके हाऊसफुल्ल जातील याची खात्री देता येत नाही. त्यात प्रायोगिक नाटक असेल तर प्रेक्षक रंगमंचाच्या दिशेने आणणे तसे कठीण असते. या प्रायोगिक नाटकासाठी अनेक संघटना, संस्था विविध उपक्रम राबवित असतात. दामू केंकरे यांचा वावर रंगमंचावर, चित्रपट यांच्यासाठी जसा होता तसा प्रायोगिक रंगमंचावरही तेवढेच त्यांचे वावरणे होते. त्यांचे हे योगदान लक्षात घेऊन साहित्य संघाने त्यांची आठवण म्हणून पाच दिवसाचा प्रायोगिक नाट्य महोत्सव आयोजित केला होता. विशेष म्हणजे यात अजित भुरे निर्मित 'नेव्हर माईंड' याही नाटकाचा समावेश होता. या नाटकाच्या निमित्ताने रंगकर्मीमध्ये आणि आयोजकांमध्ये आनंदी वातावरण निर्माण झाले. त्याचे कारण म्हणजे अडगळीत पडलेला हाऊसफुल्लचा बोर्ड या नाटकाच्या निमित्ताने आयोजकांना नाट्यगृहाच्या बाहेर लटकावा लागला होता.थोडक्यात काय तर अनेक महिने बंद असलेली बाल्कनी त्यानिमित्ताने उघडावी लागली. इतरवेळी नाटक उत्तम आहे, प्रेक्षकांचा छान प्रतिसाद मिळतो आहे अशाच नाटकाची निर्मिती करा. असे काहीसे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अजितला सांगितले जाते. पण हा अनपेक्षितपणे खणखणलेला मोबाईल साहित्यसंघाची बाल्कनी उघडल्याचा सांगणारा होता. याशिवाय या महोत्सवात तू आणि मी, कोंडी, एक रात्र बिसलेरीची ही नाटके झाली.

# भंगार गोळा करणारा ६ दिवसापासून बेपत्ता

सिंधुदुर्ग, ता.१३- आरोंदा- देऊळवाडी येथून राजू देवदास इंगळे (३५) हा भंगार गोळा करायला गेला असता परतला नसल्याने बेपत्ता असल्याची खबर त्याची पत्नी शेवंता इंगळे हिने सावंतवाडी पोलिसात दिली आहे. राजू हा सोमवारी ७ मे रोजी सकाळी ७ वाजता भंगार गोळा करण्यासाठी जातो सांगून गेला असता, अद्याप परतला नाही. त्याच्या अंगात हाफ काळी पँट, लाल व पांढऱ्या रंगाचे पट्टे असलेले टी शर्ट, रंग सावळा व साधारण दाढी असून सावंतवाडी पोलिसांनी नापत्ता असल्याची नोंद केली आहे.

**जिल्हा परिषद ठाणे**
**बांधकाम विभाग (पूर्व) जव्हार**
**निविदा सुचना e-Tender क्र. २ (दुसरी वेळ) (सन २०१२-१३)**

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांनी e-Tendering द्वारे रस्ते दुरुस्ती देखभाल अंतर्गत ८ (ता. पालघर) कामांसाठी खुली निविदा मागवित आहेत.

१. सदरची पूर्ण निविदा प्रक्रीया ही online पध्दतीने होणार आहे.
२. विस्तृत माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
३. सदरची निविदा दि. १४/०५/२०१२ रोजी ११.०० वाजेपासून ते दि. २१/०५/२०१२ रोजी १७.३० वाजेपर्यंत Online Download करता येईल. दि. २४/०५/२०१२ रोजी १७.३० वाजेपर्यंत Online पध्दतीने स्विकारण्यात येतील.
४. यापुढील सर्व शुध्दीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरूनच प्रसिध्द करण्यात येईल.

सही/-
कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग (पूर्व) जव्हार
जिल्हा परिषद, ठाणे

सही/-
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, ठाणे

# कराडच्या कामथी गावात आढळला बेपत्ता मुलीचा मृतदेह

कराड, ता. १३ - तालुक्यातील कामथी गावातील एका ११ वर्षीच्या बेपत्ता मुलीचा मृतदेह त्याच गावाच्या परिसरात आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. पूनम महेंद्र घोरपडे असे या दुर्दैवी मृत मुलीचे नाव असून तिचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याचा पोलीस तपास करीत आहेत.

कामथी गावातील पूनम मर्हेद्र घोरपडे (११) ही शाळकरी मुलगी शुक्रवारी रात्री १० वाजता आपल्या शेजारी असलेल्या रामचंद्र दादू घोरपडे यांच्या घरी टीव्ही पाहण्यासाठी गेली होती. काही वेळ टीव्ही पाहून पूनम घरी जाण्यासाठी म्हणून निघाली. मात्र रात्री उशीरापर्यंत पूनम आपल्या घरी पोहचली नाही. त्यामुळे तिचे वडिल आपल्या शेजाऱ्याकडे तिच्या चौकशरसाठी आले. त्यावेळी शेजारी असलेले रामचंद्र घोरपडे यांनी सांगितले की, पूनम केव्हाच आपल्या घरी निघून गेली आहे. त्यामुळे सर्वांनी तिची शोधाशोध सुरू केली. रात्रभर संपूर्ण गाव पिंजून काढले. परंतु कुठेही पुनमचा पत्ता लागला नाही. त्यामुळे काल शनिवारी तिच्या वडिलांनी कराड पोलिसांत पूनम बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदविली. पोलीस तपास सुरू झाला आणि आज सकाळी पूनमचा मृतदेह कामथी गावातच आढळून आला. तिचा मृत्यू नेमका कशामुळे झाला? हे समजू शकलेले नाही. मात्र तिच्यावर कुणा नराधमाने अत्याचार करून तिचा केला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलीस व्यक्त करीत आहेत.

**REDEVELOPMENT OF HOUSING SOCIETY**
Offers are invited from reputed Developers/ Builders for the REDEVELOPMENT of our existing society (Conveyance with society)
**SHRI JAY SUKH CHS LTD.**
C.T.S No.44 of Village Malad on Plot No.89- P/ North ward
1) Existing Area-7383.Sq.ft
2) Plot Area-627 Sq.mts.
Near Liberty Garden, Road No. 3 Malad (W), Mumbai 64
Tenders are available from PMC's Office
**EDIFICE ERECTION P. LTD.**
A- 101, Greenwoods, New Link Road, Chikuwadi, Borivali (West), Mumbai- 92
from 14th may to 24th may
Bet. 12.00 pm to 6.00 pm
Tender Fees: Rs. 10,000/- D.D - Non refundable






# संगमनेर तालुक्याला पावसाने झोडपले! वीज पडून गुराखी ठार

संगमनेर, ता. १३ - संगमनेर शहर व तालुक्याला काल सायंकाळी वादळी-वाऱ्यासह गारांच्या मुसळधार पावसाने चांगलेच झोडपून काढले. तर तालुक्यातील चिंचोली गुरव येथील एका गुराख्याच्या अंगावर वीज पडून त्याचा मृत्यू झाला.

सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. उन्हाच्या काहीलीने जीवाची लाही-लाही झाली. हवेत प्रचंड उकाडा जाणवत होता. दुपारी तीन वाजल्यापासून आकाशात ढग दाटून आले. क्षणाचाही विलंब न होता विजेच्या कडकडाटासह जोरदार वादळी-वाऱ्यासह पावसास सुरुवात झाली. त्यामुळे शहरातील शनिवारच्या आठवडे बाजाराची दाणादाण उडाली. शहरानजिक असणाऱ्या घुलेवाडी शिवारात दोघा शेतकऱ्यांच्या गायीचे गोठ्याचे पत्रे उडून गायी जखमी झाल्या. तर काही ठिकाणी निंब, बाभळीची झाडे उन्मळून पडली. तर एका शेतकऱ्याच्या घरावरील पत्रे उडून संसार उघड्यावर पडला. तर गोल्हार-घोटी राज्यमहामार्गावर झाडे उन्मळून पडली.

तालुक्यातील चिंचोली गुरव शिवारात गणेश शंकर पगारे (५०) हा शेतकरी शेतात शेळ्या चारण्यासाठी गेला होता. परिसरात वादळी-वाऱ्यासह झालेल्या पावसाने झाडाखाली उभे असलेल्या पगारे यांच्या अंगावर वीज पडून जागीच ठार झाले. तर समनापूर, वडगाव पान, कोल्हेवाडी परिसरात गारांचा पाऊस पडल्याने डाळिंब व कांदा पीकाचे नुकसान झाले. सुळेवाडी येथे प्राथमिक शाळेवरील पत्रे उडाले. तर कोपरगाव व संगमनेर तालुक्याच्या सरहद्दीवर असणाऱ्या राजणगाव देशमुख शिवारात रावसाहेब रघुनाथ वर्पे यांच्या मालकीच्या बैलाच्या अंगावर वीज पडून बैल ठार झाला.

## वसई स्टेशन परिसरात फेरीवाल्यांचा उपद्रव वाढला

वसई, ता. १३ - वसई-विरार महापालिका 'ड' प्रभागातील नवघर विभागीय कार्यालयाच्या परिसरात फेरीवाल्यांचा उपद्रव दिवसेंदिवस कारवाईच होत नसल्याने वाढत चालला आहे. वसई स्टेशन परिसर आनंदनगर, अंबाडी रोड मंडई, मोक्याची ठिकाणे, नाके, बसस्टॉप तसेच सार्वजनिक ठिकाणी फेरीवाल्यांनी आपले बस्तान मांडले आहे.

रस्त्याच्या दुतर्फा फेरीवाले असल्याने पदपथावर जाताना नागरिक, करदाते, ज्येष्ठ नागरिक, मुली-स्त्रिया यांना द्रविडी प्राणायाम करायला लागत आहे. वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस भीषण होत आहे. मनपाचा अतिक्रमण विभाग या मस्तवाल फेरीवाल्यांवर कारवाईचा बडगा का उगारत नाही. याचा उलगडा होत नाही, गेल्या वर्षभरात अतिक्रमण विभागाने कोणतीही ठोस प्रशासकीय कारवाई का केली नाही, याचे उत्तर अतिक्रमण विभागप्रमुख कापडी यांनी विचारले असता, ते आपल्या कार्यालयात व दूरध्वनीवर उपलब्धच होत नाहीत.



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने केंद्र/ राज्य योजना संनियंत्रण समितीच्या जनसेवकांची राज्यस्तरीय बैठक शुक्रवारी टिळक भवन दादर येथे संपन्न झाली. त्याप्रसंगीच्या छायाचित्रात उद्घाटन करताना मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, महाराष्ट्राचे प्रभारी मोहन प्रकाश, प्रांताध्यक्ष माणिकराव ठाकरे दिसत असून केंद्र/राज्य योजना संनियंत्रण समितीचे अध्यक्ष विनायकराव देशमुख, सरचिटणीस यशवंत हप्पे, प्रदेश पदाधिकारी सचिन सावंत, राजाराम देशमुख, माजी मंत्री वसुधाताई देशमुख, श्री सातपुते व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. **(छाया : गजानन घुर्ये)**

## बेपत्ता तरुणाची काजूबागेत गळफास लावून आत्महत्या

सिंधुदुर्ग, ता. १३ - मळेवाड जकातनाका येथील बेपत्ता प्रल्हाद वसंत नाईक (३०) याने मोटारसायकल विकण्यासाठी वडिलांनी विरोध केल्याने दारूच्या नशेत आपल्याच काजूबागेत गळफास लावून आत्महत्या केली. प्रल्हाद हा ७ मे पासून बेपत्ता होता.

आरोंदा बाजारपेठेत जाऊन येतो, असे सांगून घरातून मोटारसायकल घेऊन बाहेर पडलेला प्रल्हाद ९ मे पर्यंत घरी परत न आल्याने त्याचे वडील वसंत नाईक यांनी सावंतवाडी पोलिसांत तो बेपत्ता असल्याची खबर दिली होती. याप्रकरणी अधिक तपास आरोंदा पोलीस दूरक्षेत्राचे पोलीस डिसोजा करीत होते. ९ मे रोजी दुपारी प्रल्हादचा भाऊ आपल्या मळेवाड येथील काजू बागेत काजू वेचण्यासाठी गेला असता, प्रल्हाद याचा गळफास लावलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. मोलमजुरी करून चरितार्थ चालविणाऱ्या प्रल्हादने घरातील मोटारसायकल विकण्याची गळ वडिलांना घातली होती. परंतु त्यांनी स्पष्ट शब्दात नकार दिल्याने प्रल्हादने काजूबागेत गळफास लावून आत्महत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

## दुचाकी चोरट्यांना गुन्हे शाखेकडून अटक

भिवंडी, ता. १३ - शहर परिसरात वाहनचोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने त्या रोखण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे उभे राहिले आहे. वाहनचोरीच्या गुन्ह्यांचा तपास गुन्हे अन्वेषण युनिट -२ चे पोलीस करीत असताना दोन दुचाकीचोरांना अटक केली आहे.

रोहित ओमप्रकाश शर्मा आणि श्याम ऊर्फ प्रेमसिंग चव्हाण अशी अटक करण्यात आलेल्या दुचाकीचोरांची नावे आहेत. त्यांच्याकडून ४ दुचाकी गुन्हे अन्वेषण पोलिसांनी जप्त केल्या आहेत. भिवंडी शहर पोलीस ठाण्यात मानससरोवर येथून चोरीस गेलेल्या दुचाकीबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याबाबतचा तपास गुन्हे अन्वेषण युनिट -२ कडे वर्ग करण्यात आला असता गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बाळा शिरसाट यांनी कुशलतेने तपास करून रोहित शर्मा आणि श्याम चव्हाण या दोन अट्टल दुचाकी चोरट्यांना अटक केली.

## सावंतवाडी मच्छीमार्केट परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य

सिंधुदुर्ग, ता. १३ - सावंतवाडी शहरातील मच्छी मार्केट परिसरात चिकन व मच्छिचा टाकाऊ कचरा टाकल्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. याकडे पालिका आरोग्य विभाग कर्मचाऱ्यांचे लक्ष वेधले असता, दुर्लक्ष केले जात असल्याची टीका शिवसेनेचे युवा कार्यकर्ते रुपेश राऊळ यांनी केली आहे.

याबाबत थेट नगराध्यक्ष बबन साळगावकर यांच्याशी राऊळ यांनी संपर्क साधला असता, साळगावकर यांनी तत्काळ साफसफाई करण्याचे आश्वासन दिले. न.प.च्या आरोग्य व स्वच्छता विभागाकडे शिवसेनेचे रुपेश राऊळ यांनी विचारणा केली असता, कर्मचारी रजेवर गेल्याचे सांगण्यात आले. राऊळ यांनी नगराध्यक्ष बबन साळगावकर यांच्याशी तेट संपर्क साधला असता, मच्छिमार्केट परिसराची तत्काळ साफसफाई करण्याचे आदेश दिल्याची माहिती रुपेश राऊळ यांनी दिली. गेल्या दोन दिवसांपासून जुन्या फिश मार्केट परिसरामध्ये नजिकच्या चिकन सेंटरमधील टाकावू कचरा तसेच मच्छिचा कचरा कुंडीमध्ये टाकत असल्यामुळे आणि या कचरा कुंडीची साफसफाई न.प. च्या स्वच्छता विभागाकडून केली गेली नसल्यामुळे परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे.

## मानखुर्दमध्ये दोन गटांत हाणामारी! एक ठार

मुंबई, रविवार - मानखुर्द भागात तरुणांच्या दोन गटांत हाणामारी होऊन त्यामध्ये चॉपर आणि तलवारीचा सर्रास वापर करण्यात आला. या हाणामारीत चॉपरच्या वारांमुळे एक तरुण ठार झाला.

# जळगाव जिल्ह्यात वळवाच्या पावसाचे थैमान

जळगाव, ता. १३ - जिल्ह्याच्या वळव्याच्या पहिल्याच पावसाने अक्षरशः थैमान घातले. दुपार पासून वारा-वादळ, विजांचा कडकडाटासह जिल्ह्यात कमी-अधिक प्रमाणात पाऊस झाला. यात वीज पडल्याने चौघांचा, वादळाच्या तडाख्याच्या अपघाताने दोघांचा तर झाड अंगावर पडल्याने एका महिलेचा बळी गेला आहे. या तडाख्यात यावल रावेर तालुक्यातील केळी बागा जमीनदोस्त झाल्या असून कोट्यवधींचे नुकसान झाले आहे.

मे महिना व तापमान ४७ अंशापर्यंत अशी जळगावची कायमचीच महती आहे. तथापि या वर्षी येथील तापमान ४३ अंशाच्या वर गेलेच नाही. तापमान फक्त ३९ ते ४१ असेच स्थिरावलेले असताना उन, सावलीचा खेळही येथे सुरू आहे. तशातच गुरुवारी दुपार नंतर वातावरण अचानक बदलले व जिल्ह्यात जवळपास सर्वच तसलुक्यात वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह वळव्याच्या पावसाने जोरदार थैमान घातले. यात सातजणांचा बळी गेला तर काहीजण जखमी झाले असून केळी बागांचेही मोठे नुकसान झाले आहे.

चौपडा तालुक्यातील नागलवाडी येथे रामदास उत्तम पाटील व जालम बारेला यांच्या अंगावर वीज कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर मडगाव येथील शेतात काम करणाऱ्या सुनंदा सीताराम पाटील या महिलेच्या अंगावर वीज पडल्याने तिचा बळी गेला. तसेच चरावर तालुक्यातील उटखेडा येथील हसीना मेहबूब तडवी या शेतात सरपण गोळा करणाऱ्या महिलेच्या अंगावर वीज पडल्याने जिच मृत्यू झाला.

अमळनेर तालुक्यातील अमळगाव येथील वीट कामगाराचा वादळामुळे तुटलेली विद्युत तार अंगावर पडल्याने मृत्यू झाला तसेच शरद नातानी मोरे व दीपक पाटील यांचाही वादळाच्या तडाख्यात सापडल्याने अपघाती मृत्यू झाला.

## देवबाग शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

रत्नागिरी, ता. १३ - १९५९ साली भाडोत्री जागेत झोपडीमध्ये सुरू झालेल्या प्रशालेत शिकून गेलेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा नुकताच डॉ. दत्ता सामंत इंग्लिश स्कूल देवबाग (ता. मालवण) च्या प्रांगणात संपन्न झाला. या मेळाव्याचे आयोजन अखिल देवबाग विकास मंडळाचे सरचिटणीस तसेच माजी विद्यार्थी मुरलीधर मणचेकर यांनी केले होते. या मेळाव्याला गोवा विद्यापीठाचे उपकुलगुरू दिलीप देवबागकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर कार्याध्यक्ष जगन्नाथ कद्रेकर, संस्थेचे उपाध्यक्ष महेश प्रभू, चंद्रकांत चोडणेकर, आनंदराव खराडे, दिलीप घारे, लक्ष्मीकांत खोबरेकर उपस्थित होते. शहरात शाळा डोनेशनवर चालतात. देवबागच्या विद्यार्थ्यांनी आम्हाला डोनेशन देऊ नये, मात्र ही जवळची शाळा सोडून लांबच्या शाळेत जाऊ नये, असे कळकळीचे आवाहन मुरलीधर मणचेकर, शाळेचे आधारस्तंभ जगन्नाथ कद्रेकर यांनी केले. दरवर्षी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्याच्या रविवारी मेळावा घेण्याचे ठरले. प्रास्ताविक मुख्याध्यापक एन.बी. गवई यांनी केले तर सूत्रसंचालन उदय घाटवळ, रुपेश खोबरेकर यांनी केले.

# पालिका शाळांतील पावणेपाच लाख विद्यार्थ्यांना यंदा सुगंधी दूध मिळणार

मुंबई, रविवार - गेल्या दोन वर्षांपासून वादात सापडलेल्या सुगंधी दुधाचा प्रश्न संपुष्टात आला असून येत्या शैक्षणिक वर्षापासून पालिका आपल्या पावणेपाच लाख विद्यार्थ्यांना देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी पालिका चक्क १२१ कोटी खर्च करणार आहे, तसा प्रस्ताव तयार करून स्थायी समितीच्या मंजुरीसाठी लवकरच सादर करणार आहे.

पालिका शाळांतील विद्यार्थ्यांना योग्य प्रमाणात पोषण मूल्ये व उष्मांक (कॅलरिज) मिळून त्यांचे आरोग्य सुधारावे आणि दररोज उपस्थितीत राहण्यासाठी पालिकेने सन २००७ पासून इयत्ता १ ली ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सुगंधी दूध टेट्रापॅकद्वारे २०० व १२५ मि.ली. पुरवठा करण्याची योजना पालिकेने सुरू केली होती. मात्र, या सुगंधी दुधाने काही मुलांना अपचन होऊन विषबाधा झाली. अशा घटना दोन वेळा घडल्याने दुधाची योजना त्यावेळी बंद ठेवण्यात आली. या धागा पकडून लोकप्रतिनिधींनी श्रेयासाठी राजकारण केले. त्यामुळे पालिकाही या दुधाबाबत जोखीम घेण्यास पालिका तयार नव्हती. परदेशात ५२ ठिकाणी आणि ४० शाळांना दूधपुरवठा करण्याचा वारणा प्रकल्पाचे दूध बंद केले आणि आता शासकीय महानंदाचे सुंगधी दूध देण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे गेल्या दोन वर्षांपासून आतुरतेने वाट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना येत्या शैक्षणिक वर्षापासून सुगंधी दूध चाखायला मिळणार आहे. इयत्ता ४थी ते १०वी च्या विद्यार्थ्यांना २०० मि.ली. आणि इयत्ता १ ते ४थी च्या विद्यार्थ्यांना १२५ मि.ली. टेट्रापॅकद्वारे दूध मिळणार आहे. २०० मिली दुधासाठी ७७ कोटी व १२५ मि.ली. दुधासाठी ४४ कोटी असे १२१ कोटी रुपये खर्च करणार आहे. याचा प्रस्ताव तयार केला असून स्थायी समितीच्या मंजुरीसाठी लवकरच पाठविण्यात येणार आहे.

## बांदा-वाफोली रस्त्यासाठी आजपासून आमरण उपोषण

सिंधुदुर्ग, ता. १३ - बांदा ते वाफोली या ग्रामीण रस्त्याच्या डांबरीकरणासाठी वर्षाभरापूर्वी पाच लाख रुपये मंजूर करण्यात आले. या रस्त्याच्या कामास अद्याप सुरुवात न केल्याने शासनाचे लक्ष वेधणासाठी वाफोली आईरवाडीतील संजय गुणाजी आईर यांनी सोमवार १४ मे रोजी या रस्त्यावरच आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. याबाबतचे निवेदन आईर यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अभियंता, बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंता यांना दिले आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे या मार्गावरील एस.टी. वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. यामुळे शालेय विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना बांदा शहरात येण्यासाठी दररोज ३ ते ४ कि.मी. पायपीट करावी लागत आहे. २०१०-१०११ या आर्थिक वर्षांत विविक्षित दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत या रस्त्याचे काम मंजूर करण्यात आले. मात्र, अद्यापपर्यंत कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. वेळोवेळी पाठपुरावा करूनही कामास सुरुवात न केल्याने उपोषणाचा इशारा संजय आईर यांनी निवेदनात दिला आहे.

# भिवंडीत शौचालय चालकांचा खून

भिवंडी, ता.१३- शहर महानगरपालिकेचा मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणात समावेश करण्यात आल्याने शहर परिसर स्वच्छ असावा, या हेतूने एमएमआरडीएच्या आर्थिक मदतीने झोपडपट्टीव इतर सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहे (शौचालये) सुरू केली आहेत. मात्र या शौचालयांचा पालिका प्रशासनातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बाजार केल्याने झोपडपट्टी व सर्वसामान्य घरातील व्यक्तीला शौचालयात जाणे परवडत नसल्याने खर्चिक झाले आहे. गायत्रीनगर येथील शौचालय चालकाने शौचाचे पैसे मागितल्याच्या वादातून त्याचा खून झाल्याची घटना नुकतीच घडली आहे. तर दुसरीकडे झोपडपट्टी भागातून शौचाने भरलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमध्ये टाकीत असल्याचे भयानक प्रकार उघडकीस येत आहेत.

शहरात एमएमआरडीएच्या अनुदानातून निर्मल एमएमआर अभियानांतर्गत २०७ वस्ती, शौचालये बांधली आहेत. मनपाचे काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमत करून ११६ वस्ती शौचालये स्थानिक नागरिकांच्या गटांना न देता ती शहरातील इतर संस्थांना व मुंबईच्या स्वयंसेवी संस्थांना शौचालयात जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून १ ते २ रुपये वसूल केले जात आहेत. लहान मुलांनाही त्यातून सोडले जात नाही.

दरम्यान, गायत्रीनगर येथील नागरिकांकडून पैसे मागितल्याने शौचालय चालक नागराज पिंगळे याचा खून झाल्याची घटना ताजी आहे.

# फरशीकाम करणाऱ्या दोघांना मारहाण करून ठार मारण्याची धमकी

सिंधुदुर्ग, ता.१३- कोलगाव झिरंगवाडी येथे फरशी काम करणाऱ्या दोघा कामगारांना मोठी दुखापत करून मारहाण, शिवीगाळ व ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सावंतवाडी पोलिसांनी सोहेल शौकत बेग (२०) रा. सालईवाडा, जोहूर गफूर खान (२४) रा. कोलगाव झिरंगवाडी, हुसेन राजासाब मुजावर (१९) रा. झिरंगवाडी व याकूब ऊर्फ पप्पू चाँद शेख (२९) रा. सालईवाडा सावंतवाडी या चौघांना अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांची प्रत्येकी १५ हजार रुपयांच्या जामिनावर मुक्तता केली.

याबाबतची तक्रार सत्यवीरचा भाऊ राजेंद्र काळूराम सैनी रा. कोलगाव, विद्यानगर, मूळ रा. जयपूर राजस्थान याने सावंतवाडी पोलिसात दाखल केली होती. सावंतवाडी पोलिसांनी सोहेल बेग, जोहूर गफूर खान व अन्य दोघांविरुध्द गुन्हा दाखल केला होता. कोलगाव झिरंगवाडी येथील इरफान शेख याच्या घरातील फरशीचे काम करणारे कारागिर सत्यवीर सैनी व त्याचा साथीदार मुकेश किराळ या दोघांना शौकत बेग व त्याच्या अन्य तिघा साथीदारांनी क्षुल्लक कारणावरून लोखंडी शिग व लाकडी दांड्याने बेदम मारहाण केली होती. आरोपींतर्फे ॲड. सोहेब डिंगणकर यांनी काम पाहिले.


बृहन्मुंबई महानगरपालिका

**मनपा पॉवर लाँड्री**

**क्र. ए.ई. (एमपीएल)/२९७/दि. ०७.०५.२०१२**

**स्वारस्याची अभिव्यक्ती**

प्रतिदिन खाजगी तत्त्वावर विविध मनपा इस्पितळांच्या २०००० मळके कपडे धुण्याची क्षमता असलेल्या, भोईवाडा, परेल येथील मनपा पॉवर लाँड्रीचे कामकाज व देखभालीकरिता निविदा मागविण्यासाठी दस्तावेजांच्या तयारीकरिता समुपदेशक सेवांचे काम करण्यासाठी इच्छुक असलेल्या सर्व संस्थांकडून स्वारस्याची अभिव्यकी मागविण्यात येत आहेत ज्यामध्ये सध्याच्या लाँड्री मशिनरीच्या कार्यनिष्पादनाचा अभ्यास समाविष्ट आहे तसेच उत्तम दर्जाच्या धुलाईसाठी आधुनिक वा सुधारित पद्धती सुचवण्यासाठी व धुतलेले कपडे संबंधित इस्पितळांना २४ तासांच्या आत पोहोचवण्यासाठी तसेच बीओओटी तत्त्वावर पूर्व व पश्चिम उपनगर क्षेत्रातील मनपा इस्पितळांसाठी लाँड्री युनिट्सच्या आर्थिक प्रतिष्ठापनासाठीच्या व्यवहार्यतेवर अभ्यास करणे यामध्ये संबंधित इस्पितळांतून व वैद्यकीय संस्थांतून कपडे गोळा करणे व वितरण करण्याचा समावेश किंवा प्रत्येक मनपा वैद्यकीय संस्थेत वेगळ्या लाँड्री युनिटच्या प्रतिष्ठापनाच्या व्यवहार्यतेसंदर्भात अभ्यास करणे यांचा समावेश आहे.

इच्छुक संस्थांनी सहायक अभियंता, मनपा पॉवर लाँड्री, भोईवाडा, परेल, मुंबई - ४०० ०१२ यांच्याकडे दि. २३.०५.२०१२ पर्यंत कोणत्याही कार्यदिवशी स. १०.३० ते सायं. ५.०० या वेळेत नोंदणकरण करावे.

इच्छुक संस्थांनी प्रोफाइलसमवेत कृपया रु. २०००/- नोंदणीकरण अधिभार म्हणून बृ.मुं.मनपाच्या मनपा आयुक्तांच्या नावे मुंबईत देय डीडीच्या स्वरूपात सादर करावेत.

**पात्रतोत्तर अर्हता निकष खालीलप्रमाणे आहेत :**

१. संस्थेला नियत तारखेपर्यंत गत ५ वित्तीय वर्षांदरम्यान प्रतिदिन १०००० कपड्यांच्या धुलाईची क्षमता असलेल्या लाँड्री युनिटच्या कामकाजाकरिता समुपदेशन सेवा देण्याचे एकेरी काम करण्याचा अनुभव असावा.
२. नियत तारखेपर्यंत गत ५ वित्तीय वर्षांदरम्यान वरील संबंधित कामाकरिता अशिलांकडून निष्पादन प्रमाणपत्र संस्थेने प्राप्त करावे.
३. संस्थेने साक्षांकनासमवेत व्हॅट व पॅन कार्ड प्रमाणपत्र सादर करावे.
४. संस्थेने किमान रु. १,००,०००/- रकमेचे बँक पत प्रमाणपत्र सादर करावे.
५. नियत तारीख व वेळेपश्चात प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
६. स्वारस्याची अभिव्यक्ती मोहोरबंद लिफाफ्यातून सादर करावी ज्यावर खाजगी तत्त्वावर भोईवाडा, परेल येथील मनपा पॉवर लाँड्रीचे कामकाज व देखभालीकरिता समुपदेशन सेवा पुरविणे तथा पूर्व व पश्चिम उपनगरांतील इस्पितळांकरिता बीओओटी तत्त्वावर लाँड्री युनिटचे प्रतिष्ठापनासाठी व्यवहार्यतेवर अभ्यास करणे, असे शीर्षक निर्देशित करावे.
७. समुपदेशकांची निवड करण्यासाठी समुपदेशक संस्थांद्वारे सादर केलेली माहिती व दस्तावेजांनुसार प्रस्तावांची पडताळणी व मूल्यांकन महानगरपालिकेद्वारे करण्यात येईल. केवळ निवड झालेल्या (पात्र) संस्थांनाच प्रस्ताव विनंती पाठवण्यात येईल. तथापि, कोणतेही कारण न देता कोणताही वा सर्व प्रस्ताव स्वीकारणे वा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे राखून आहे. प्रस्ताव विनंती केवळ निवड झालेल्या (पात्र) संस्थांनाच पाठवण्यात येईल.
८. सदर मागणी सूचनेत निर्देशित केलेल्या अंतिम तारीख व वेळेनंतर प्राप्त कोणत्याही प्रस्तावासंदर्भात कोणतेही स्पष्टिकरण वा पत्रव्यवहारातील कोणताही विलंब वा कारण महानगरपालिकेद्वारे स्वीकारले जाणार नाही.
९. सर्व दस्तावेजांसमवेत स्वारस्याची अभिव्यक्ती सहायक अभियंत्यांचे कार्यालय, मनपा पॉवर लाँड्री, रस्ता क्र. ३९, स्कीम क्र. ५७, नायगाव पोलीस प्रशिक्षणकेंद्राच्या समोर, भोईवाडा, परेल, मुंबई -४०० ०१२ येथे दि. २४.०५.२०१२ रोजी दु. १.०० पर्यंत सादर करावेत.
१०. अ. क्र. १, २, ३ व ४ च्या संदर्भातील कागदोपत्री पुरावे साक्षांकन प्रस्तावासमवेत सादर करावेत.

पुढील तपशील/माहितीकरिता कृपया बृ.मुं.मनपाच्या खालील अधिकाऱ्यांशी सहायक अभियंत्यांचे कार्यालय, मपना पॉवर लाँड्री, रस्ता क्र. ३९, स्कीम क्र. ५७, नायगाव पोलीस प्रशिक्षणकेंद्राच्या समोर, भोईवाडा, परेल, मुंबई -४०० ०१२ येथे संपर्क साधावा :

१. श्री. पटेल ए.आर., उपमुख्य अभियंता (एम ॲन्ड ई) शहर
मोबा. : ९८२०२३४८५७, कार्यालय क्र. : ०२२२३०११९७४
२. श्री. पगारे पीआर कार्य. अभि. यांत्रिकी (दक्षिण)
मोबा. ९९३०१२८३८६, कार्यालय : ०२२२३०७६१६५
३. श्री. सातपुते एमटी सहायक अभियंता , मनपा पॉवर लाँड्री
मोबा. : ९८२१८६३४१२, कार्यालय : ०२२२४१११४२२

**सही/-**
**उपमुख्य अभियंता (एम ॲन्ड ई) शहर**

**पीआरओ/१२८/जाहि.**

पाणी वाचवा, पाण्याचा वापर काटकसरीने करा

# मालाड पश्चिम परिसरात फेरीवाल्यांमुळे जनता त्रस्त



मुंबई, रविवार - मालाड रेल्वे स्टेशनच्या पश्चिम बाजूस आनंद रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाल्यांमुळे येथील जनता त्रस्त झाली आहे. या रस्त्यावर पादचाऱ्यांना चालण्यास जागा शिल्लक राहिलेली नाही. रेल्वे स्टेशनपासून एस. व्ही. रोडवर पोहचण्यास १० मिनिटाच्यावर कालावधी लागतो.

या रस्त्यावर ट्रॅफिकची समस्या गंभीर झाली आहे. येथील वॉर्ड क्र. ३२ मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे वॉर्ड अध्यक्ष परशुराम शर्मा यांनी याबाबत महानगरपालिकेमध्ये 'पी' उत्तर विभागातून आयुक्तापर्यंत पत्रव्यवहार केला आहे. परंतु त्यांना कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई होत नसल्याची खंत आहे.

शर्मा म्हणाले की, 'आमच्याकडे खैरनारांसारखे आयुक्त असते तर ही समस्या केव्हाच सुटली असती. आनंद रोडवर फेरीवाले बसतात. ही अडचण नाही. परंतु ज्याप्रकारे हे फेरीवाले अस्तव्यस्त होऊन जागा व्यापतात, त्यामुळे सामान्य जनजीवनावर त्याचा परिणाम होत आहे.

मालाड पश्चिमेकडील महापालिकेच्या मार्केटजवळ फेरीवाले पादचाऱ्यांना चालायला रस्ताच सोडत नसल्याची तक्रार शर्मा यांनी केली आहे. महापालिका आणि पोलिसांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष घालावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडणार असल्याचे परशुराम शर्मा यांनी सांगितले.

# उल्हासनगर महानगरपालिका नालेसफाई अधांतरीच

उल्हासनगर, ता. १३- कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, अंबरनाथ नगर परिषद या सर्वांच्या नालेसफाईच्या निविदा येऊन, प्रक्रिया पूर्ण होऊन एक आठवड्यापूर्वी नालेसफाईला सुरुवात झाली, पण उल्हासनगर महानगरपालिका मात्र अद्यापही नालेसफाईबाबत उदासीन आहे.

यासंदर्भात उल्हासनगर महापालिकेचे उपायुक्त विनोद डवले यांनी सांगितले की, नालेसफाईच्या संदर्भात उल्हासनगर महानगरपालिकेने निविदा मागविल्या होत्या. एकूण चार निविदा महापालिकेला प्राप्त झाल्या असून अजित ट्रान्सपोर्ट, ईगल कन्स्ट्रक्शन, शुभम कन्स्ट्रक्शन आणि व्ही. आर. पनवेलकर यांनी निविदा भरल्या आहेत. यापैकी अजित ट्रान्स्पोर्ट यांनी अनामत रक्कम ३८,००० रुपये (ईएमडी) भरली नाही. त्यामुळे अजित ट्रान्स्पोर्टची निविदा रद्द करण्यात आली आहे. अन्य तीनपैकी ईगल कन्स्ट्रक्शनने ३२ टक्के जादा, शुभम कन्स्ट्रक्शनने २७ टक्के जादा आणि व्ही.आर. पनवेलकर यांनी १० टक्के जादा दराने निविदा भरली.

यावेळी महापालिकने व्ही. आर. पनवेलकर यांची निविदा सर्वात कमी दराची असल्याने त्यांना चर्चेसाठी बोलावले. चर्चेत व्ही.आर. पनवेलकर ९ टक्के जादाने काम करण्यास तयार असल्याचे ठेकेदाराने सांगितले. त्यामुळे व्ही.आर. पनवेलकर यांची निविदा येत्या स्थायी समितीच्या बैठकीत ठेवली जाईल. स्थायी समितीच्या निर्णयानंतर ठेकेदाराला कार्यादेश देण्यात येईल, असे उपायुक्त विनोद डवले यांनी सांगितले.

# सहा अट्टल गुन्हेगारांची टोळी रत्नागिरी पोलिसांच्या ताब्यात

रत्नागिरी, ता. १३ - रत्नागिरी घरफोड्यांमध्ये सहभागाचा आरोप ठेवून अटक केलेले सहाजण गंभीर स्वरूपातील गुन्हेगार असल्याचे प्राथमिक तपासात आढळून आल्याची माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक बाजीराव पाटील यांनी दिली.

कर्नाटकात खून, दरोडा, घरफोडी रस्त्यावरील वाहनातून लुटालूट असे गुन्हे केल्याने यातील काही लोक हिंदलहा आणि बेल्लारी तुरुंगाची हवा खाऊन आल्याची माहिती त्यांनी दिली. याप्रकरणी रत्नागिरी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने सोनाली ऊर्फ अर्जुन नथीमाला पवार (३०) आरक-मिरज, विजुत तेजपूल पवार (२५), टाकळी बुळवाड -मिरज रामगोल ऊर्फ कुमार पांडु पवार (३६), मानमोडी -मिरज, गौडा परबत ऊर्फ सुनील भोसले (२३) वड्डी मिरज इन्टी ऊर्फ व्यंकटेश त्रिभूवन ऊर्फ याप काळे (३०) मालगाव -मिरज जलवा ऊर्फ यग श्रीकांत ऊर्फ शेसफूल भोसले (२८) तासगाव-सांगली या सहाजणांना अटक केली आहे.

# तळकट येथील वनबाग आता विविध पर्यटन सुविधांनी सुसज्ज होणार

सिंधुदुर्ग, ता. १३ - तळकट येथील वनबाग आता विविध पर्यटन सुविधांनी सुसज्ज करून पर्यटकांसाठी खुली करण्यात येणार आहे. वनबागेच्या पर्यटनदृष्ट्या विकासासाठी पर्यटननिधी अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळांकडून निधी उपलब्ध होणार असून यासंर्दभात कार्यवाही पूर्ण झाली असल्याची माहिती उपवनसंरक्षक तुकाराम साळुंखे यांनी दिली. या वनबागेच्या पर्यटनदृष्ट्या विकासासाठी वन विभागाने वारंवार वाठपुरावा केला होता. आता या प्रयत्नांना यश आले आहे. जिल्हा नियोजन मंडळाकडून आजा यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

यातून वन बागेच्या ७० एकर क्षेत्राचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यात येणार आहे. हे क्षेत्र पर्यटनदृष्ट्या विकसित करताना पर्यटकांच्या निवासासाठी तंबू निवास या सारख्या योजना राबविण्यात येणार आहेत. या वनबागेची सर्वांत मोठी शान म्हणजे हमखास आढणारे वन्यप्राणी. हे वन्यजीवन न्याहाळण्यासाठी ही सुविधा उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यामध्ये टेहाळणी मनोऱ्यांची सुविधा असणार आहे. यामधून पाच टेहाळणी मनोरे उभारण्याचे नियोजन वन विभागाने केले आहे. तळकट (ता. दोडामार्ग) येथील ही वनबाग ११ हेक्टरमध्ये पसरली आहे. त्याशिवाय या वनबागेच्या आजूबाजूला ४२ हेक्टरपेक्षा जास्त राखीव वनक्षेत्र आहे. या वनबागेत भलेमोठे वृक्ष, दुर्मीळ वनौषधी, अनेक दुर्मीळ प्राणी-पक्षांसह कधी-कधी पट्टेरी वाघ, बिबट्या यांचेही दर्शन होते.

# विकास आराखड्यावर सर्वांगीण चर्चा करण्यासाठी १९ मे रोजी सभा

कल्याण, ता. १३ - कल्याण-डोंबिवली महापालिकेचा सुधारित शहर विकास आराखड्याबाबत विचारविनिमय व त्यासंदर्भात सर्वांगीण चर्चा करण्यासाठी येत्या शनिवारी १९ मे रोजी सकाळी १० वाजता महापालिकेतर्फे कल्याणच्या अत्रे रंगमंदिरात एकदिवसीय चर्चासत्र आयोजण्यात आले आहे. तरी नागरिकांनी त्यांची मते मांडण्यासाठी या चर्चासत्रात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

सदर एकदिवशीय चर्चासत्रात शहरातील वास्तूविशारद, इंजिनिअर्स, डॉक्टर्स, पत्रकार, विविध संस्थांचे पदाधिकारी आदी मान्यवर प्रतिष्ठित नागरिकांना महापालिकेने यावेळी आमंत्रित केले आहे. या चर्चासत्रात प्रथम महापालिकेतर्फे शहराची विद्यमान स्थिती, महापालिकेची आर्थिक कुवत, विकासाची संधी असलेला क्षेत्र याबाबत सादरीकरण केले जाईल. तर नंतर मे क्रिसिल रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन लि. या संस्था त्यांच्या दृष्टीतून विकासाबाबतचे सादरीकरण करणार आहे. तसेच बांधकाम व्यवसायिकांची (एमसीएचआय) या संघटनेने देखील मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या सांगण्यावरून शहर विकास आराखड्याबाबत केडिएमसीकडे विविध प्रकल्पांचे सादरीकरण केले आहे.

# महाड औद्योगिक क्षेत्रात खोदकामामुळे वाहतूक कोंडी

महाड, ता.१३- महाड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यालगत असलेल्या पथदिव्यांसाठी केबल टाकण्या करिता करण्यात आलेल्या खोदकामांमुळे वाहतूक कोंडीची समस्या बिकट बनली आहे.

महाड औद्योगिक क्षेत्रात सध्या नवीन पथदिवे बसविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून त्याकरिता खोदकाम करण्यात आले आहे. मात्र खोदकाम केल्यानंतर केबल टाकण्याचे काम त्वरित सुरू होणे क्रमप्राप्त होते. परंतु एक महिना झाला. तरी संबंधित यंत्रणेने त्याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्याने वाहतूक कोंडीची समस्या कायम राहिली आहे. येथील बहुतांशी अंतर्गत रस्ते अरुंद असल्याने खोदकामातील मातीच्या ढिगाऱ्यामुळे ते अधिकच अरुंद बनले आहेत. काही ठिकाणी दोन चार-चाकी वाहने, तर काही भागात एक चार चाकी व एक दुचाकी वाहन समोरासमोरून जाऊ शकत नसल्याची स्थिती निर्माण झाल्याने वाहतुकीस प्रचंड अडथळा निर्माण झाला आहे.

# बोलण्यात गुंतवून ७८ हजाराचा ऐवज लंपास!

भिवंडी, ता.१३- अंजुर फाटा येथील बॉम्बे पॅलेस हॉटेलसमोर उभा असताना एका इसमास तिघा भामट्यांनी बोलण्यात गुंग करून त्याच्याकडील रोख ३ हजार, ४ तोळ्यांची सोन्याची चेन आणि ६ ग्रॅमची अंगठी असा ७८ हजारांचा ऐवज पळवून नेल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली आहे. प्रमोद कृष्णा भगत रा. आनंदनगर, अंजुरफाटा असे रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने फसवणूक करून चोरून नेलेल्या इसमाचे नाव आहे.

# ठाणे-बोरिवली बसला आग

ठाणे, ता.१३- ठाणे बोरिवली या मार्गावर धावणाऱ्या बेस्ट बसला दुपारी इंजिनमध्ये अचानक लागलेल्या आगीने खळबळ उडाली. यात सुदैवाने कोणीही जखमी झाले नाही. आग कशामुळे लागली. याबाबत अद्याप कारण समजू शकले नाही.

ठाणे-बोरिवली ही बेस्टची ७०० नंबरची बस शनिवारी दुपारी बोरिवलीहून ठाण्याकडे येत असताना कापुरबावडी येथे अचानक बसच्या इंजिनमध्ये आग लागली. बसचालकाने प्रसंगावधान राखुन बस रस्त्याच्या कडेला थांबविली. बसमधून सर्व प्रवाशांना सुरक्षित उतरविण्यात आले. या दरम्यान घोडबंदर रोडवरील वाहतुकीचा चक्का जाम झाला.

# 'मनसे'च्या जनहित कक्षाची पुनर्विकास परिषद संपन्न

मुंबई, रविवार - महाराष्ट्र नवनिर्माण सेना जनहित कक्ष' वडाळा विधानसभेच्या वतीने दादर येथील माधववाडी येथे 'पुनर्विकास परिषद २०१२' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटन जनहित कक्षाचे प्रमुख संघटक ॲड. पराग प्रधान यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रामुख्याने जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न व त्यात स्वयंविकासाचा पर्याय याविषयी स्थानिक इमारतींमधील भाडेकरूंना मार्गदर्शन करण्यासाठी एम.एस. डब्ल्यू.ए.चे अध्यक्ष रमेश प्रभू व ज्येष्ठ वकील ॲड. प्रकाश जगताप हे उपस्थित होते. स्थानिक भाडेकरूंच्या प्रश्नांना उभयतांनी सविस्तर उत्तरे दिली.

या पुनर्विकास परिषदेस वडाळा विधानसभेचे विभाग अध्यक्ष आनंद प्रभू, जनहित कक्षाचे विभाग संघटक ॲड. वैभव करंदीकर, महिला विभाग अध्यक्षा सौ. तारा मालवणकर यांची उपस्थिती होती. या परिषदेचे सूत्रसंचालन जनहित कक्षाचे सरचिटणीस गौरव वालावलकर यांनी केले. स्थानिक जनतेच्या आपल्या इमारतींच्या पुनर्विकासासंबंधी समस्यांचे समाधान करणारा हा कार्यक्रम मयूर सारंग, संतोष कदम, मंगेश सावंत यांनी आयोजित केला होता.

# जिल्हास्तरीय मार्गदर्शन क्रीडाशिबिराचे आयोजन

सिंधुदुर्ग, ता. १३ - सिंधुदुर्ग जिल्हा हौशी बास्केटबॉल असोसिएशन आयोजित जिल्हास्तरीय शिबिराचे आयोजन मालवणमध्ये १४ मे ते ३ जून या कालावधीत करण्यात आले आहे. सकाळी ७ ते ९ व सायंकाळी ४ ते ६ अशा दोन सत्रांत हे शिबिर चालणार आहे.

शिबिरामध्ये तज्ज्ञ मंडळी मार्गदर्शन करणार आहेत.

रनिंग वॉर्मअप, स्ट्रेचिंग याचबरोबर रस्सीखेच, कबड्डी बीच कबड्डी, लंगडी रोप स्किपिंग, मनोरंजनात्मक खेळ लगोरी, पकडापकडी, उभा खो-खो, जोडसाखळी लेझिम, मोठे खेळ-बास्केटबॉल सॉफ्टबॉल बेसबॉल बॅटरी टेस्ट मार्गदर्शन शटल रन, स्टॅंडिंग ब्रॉड जम्प ३० मी प्लाईंग स्टार्ट, बॉल थ्रो, बॉल वॉली फॉरवर्ड बेंड ॲण्ड रिच यांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. वय वर्षे ८ ते २० गटापर्यंतच्या मुलांमुलींना प्रवेश देण्यात येणार आहे.

**मुंबई कर्जवसुली न्यायाधिकरण क्र. २**
**भारत सरकार, वित्त मंत्रालय,**
**वसुली अधिकाऱ्यांचे कार्यालय**
**५ वा मजला, सिंदिया हाऊस, एन.एम. मार्ग,**
**बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ३८**

**वसुली प्रक्रिया क्र. ६९९/२००४**
पुढील तारीख : दि. २७.०६.२०१२

**स्टेट बॅंक ऑफ इंडिया** .......प्रमाणपत्र धारक
विरुद्ध
**मे. पॅरामाऊंट इंडस्ट्रीज व अन्य** .... प्रमाणपत्र ऋणको

**जाहीर सूचना**

ज्याअर्थी वरील बाबतीत प्रमाणपत्रधारक यांनी नागरी प्रक्रियेच्या सांकेतांकाच्या आदेश २२ नियम ४ए अंतर्गत मयत प्रमाणपत्र ऋणको क्र. २च्या सादरीकरणाच्या संदर्भात न्यायालयाचे अधकारी म्हणून वसुली निरीक्षक/बॅंक अधिकारी वा अन्य कोणाही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. आदेश दिनांकित ०६.०३.२०१२ नुसार सन्मा. डीआरटी - २ मुंबई यांनी दैनिक वर्तमानपत्रात जाहीर सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत.

आम जनतेच्या व सर्व संबंधित पक्षकारांच्या माहितीसाठी जे प्रमाणपत्र ऋणको क्र. २ यांच्या मालमत्तेसंदर्भात हित राखून आहेत निर्देशित करण्यात येत आहे की, सदर आदेश दि. ०६.०३.२०१२ नुसार मयत प्रमाणपत्र ऋणको क्र. २ यांच्या सादरीकरणासंदर्भात सन्मा. डीआरटी २ मुंबई श्री. राजन डी. रसाळ, उपव्यवस्थापक सीएच बॅंक यांची नियुक्ती करावयाची होती व श्री. राजन डी. रसाळ यांचे वरील संदर्भात मयत प्रमाणपत्र ऋणको क्र. २ यांच्या संदर्भात प्रतिकूल हित नाही.

माझी सही व सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी दि. १० मे २०१२ रोजी जारी.

शिक्का

**सही/-**
**(बी.एस. साने)**
**वसुली अधिकारी,**
**कर्जवसुली न्यायाधिकरण २**
**मुंबई**

अर्ज क्र.५०(विनियम ६० (४))
भारत सरकार,
वित्त मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग
**मुंबई कर्जवसुली न्यायाधिकरण क्र. ३**
६ वा मजला, सिंदिया हाऊस, एन.एम. रोड, एल ॲन्ड टी हाऊससमोर,
बॅलार्ड इस्टेट,मुंबई - ४०० ०३८.
दूर. क्र. २२६६ ५४७३, फॅक्स क्र. २२६६ ५४७३
वसुली अधिकारी, कर्जवसुली न्यायाधिकरण - ३ यांच्यासमोर
**एक्झि. ---**
**पुढील तारीख २५.०५.२०१२**

**स्टेट बॅंक ऑफ इंडिया** .....प्रमाणपत्र धारक
वि.
**मे. के बीन इंडस्ट्रीज व अन्य** .......प्रमाणपत्र ऋणको

**मागणी सूचना**

प्रति,

**१. मे. के बीन इंडस्ट्रीज**
एक भागीदारी संस्था, फॅक्टरीचा पत्ता कार्यालय क्र. ५, प्लॉट क्र. ७४, १ ला मजला, एपीएमसी मार्केट, सेक्टर - १९, वाशी व कार्यालय बी - ३६, बॉम्बे ॲनेक्स, सेक्टर - १७, नवी मुंबई - ४० ०७०५.

**२. श्री. दीपक आहुजा,** निवासी पत्ता रो हाऊस क्र. १, सेक्टर - ३, ब्राइट स्टील एमएनएफएस को-ऑप.हाऊ. सोसा. पनवेल, नवी मुंबई -४००७०५.

सन्मा. पीठासीन अधिकाऱ्याद्वारे जारी मुळ अर्ज क्र. २८७/२००१ मधील वसुली प्रमाणपत्रानुसार रु. २४,३३,२०५.७० (रु. चोवीस लाख तेहतीस हजार दोनशे पाच व सत्तर पैसे मात्र) अधिक त्यावरील देय व्याज व शुल्काची रक्कम तुमच्याकडून देय आहे.

तुम्हाला निर्देश देण्यात येत आहे की त्यांनी सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सदर रकमेचा भरणा करावा अन्यथा कायद्यानुसार वसुली करण्यात येईल.

वरील रकमेबरोबरच, तुम्हाला खालील रकमेचाहीभरणा करावा लागेल :
अ) वसुली प्रमाणपत्रातील आदेशानुसार व्याज
ब) सदर सेवा बजावण्यासंदर्भात तसेच थकबाकीच्या रकमेच्या वसुलीसाठीची अन्य प्रक्रिया यांसाठी आलेला सर्व खर्च,अधिभार व व्यय.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०९ मे, २०१२
शिक्का
सही/-
**(पंचम राम)**
वसुली अधिकारी,एमडीआरटी - ३.

बृहन्मुंबई महानगरपालिका

**लघु ई-निविदा सूचना**
**सीएच.ई./पीडी/१३०३२/२, दि. ०९.०५.२०१२**
**केन्ट रेसिडेन्सीजवळ, चंदावरकर एक्सटेन्शन रोड, एक्सार व्हिलेज, बोरिवली (प.), आर/मध्य विभाग येथील थीम गार्डनचा विकास या कामाकरिता निविदा सूचना. अंदाजित मूल्य : रु.** २,४८,२५,११२.५२/-. निविदा http://portal.mcgm.gov.in वर दि. १४.०५.२०१२ रोजी स. ११.०० पासून दि. २१.०५.२०१२ रोजी दु. १२.०० पर्यंत उपलब्ध असतील.

**सही/-**
**उपमुख्य अभियंता (पी ॲन्ड डी) उप.**
पीआरओ/१२५/जाहि./२०१२

**पाणी वाचवा,पाणी मौल्यवान आहे.**

भारत सरकार
वित्त मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग
**मुंबई कर्जवसुली न्यायाधिकरण क्र. ३**
६ वा मजला, सिंदिया हाऊस, नरोत्तम मोरारजी मार्ग, एल ॲन्ड टी हाऊससमोर
बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ०३८.दूर : २२६६५४७३ फॅक्स : २२६६ ५४७२

**सूचना**

**एम.ए. क्र. ३७/२०१२** **एक्झि. १४**

यांच्यादरम्यान,
**श्री. वॉल्टर लिगौरी एन. मोनिस** ..... अर्जदार
**वि.**
**कोटक महिंद्रा बॅंक लि.** ... प्रतिवादी

ज्याअर्थी वरील नामित अर्जदारांनी सदर न्यायाधिकरणाकडे वरील निर्देशित अर्ज सादर केलेला आहे.

ज्याअर्थी समन्स/नोटिसची सेवा सर्वसामान्य पद्धतीने लागू होऊ शकत नाही व ज्याअर्थी पर्यायी सेवेकरिता अर्ज सदर न्यायाधिकरणाद्वारे मंजूर करण्यात आला आहे.

तुम्हाला निर्देश देण्यात येत आहेत की, तुम्ही सदर न्यायाधिकरणाकडे दि. **०५.०७.२०१२** रोजी स. ११.०० वाजता व्यक्तिश: वा वकिलामार्फत हजर व्हावे व आपले लेखी कथन/म्हणणे सादर करावे व मागणी केलेली भरपाई मंजूर का होऊ नये याचे कारण द्यावे.

सूचना देण्यात येत आहे की, असे न केल्यास तुमच्या अनुपस्थितीत अर्जाची सुनावणी होऊन त्यावर निर्णय घेण्यात येईल.

**माझ्या सही व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी दि. ०२ मे, २०१२ रोजी जारी.**

शिक्का

**सही/-**
**निबंधक आय/सी**
**एमडीआरटी - ३**

प्रति,
प्रतिवादी क्र. **२) श्री. निरज विष्णू भेंडळे**
पत्ता तुलसीमन बिल्डिंग, रिक्शा स्टॅन्डजवळ, ठाकूरवाडी,
डोंबिवली (प.) - ४२१ २०१

**भारत सरकार**
**वित्त मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग**
फॉर्म ५०,
विनियमन ६० (४)
**मुंबई कर्जवसुली न्यायाधिकरण क्र. २**
५ वा मजला, सिंदिया हाऊस, एन.एम. रोड, एल ॲन्ड टी हाऊससमोर,
बॅलार्ड इस्टेट,मुंबई - ४०० ०३८.
दूर. क्र. २२६६ ५४७३, फॅक्स क्र. २२६६ ५४७३
**वसुली अधिकारी, कर्जवसुली न्यायाधिकरण - २ यांच्यासमोर**
**वसुली प्रक्रिया क्र. १३९/२०११**
**एक्झि. ०८**
**पुढील तारीख २४.०५.२०१२**

**स्टेट बॅंक ऑफ इंडिया** .....प्रमाणपत्र धारक
वि.
**श्री. नरेंद्र कल्याणजी पटेल व अन्य** ....... प्रमाणपत्र ऋणको

**मागणी सूचना**

प्रति,
१. **श्री. नरेंद्र कल्याणजी पटेल** )
भारतीय नागरिक, पत्ता सी - १०१, ग्रीन पार्क, )
गांधी नगर, डोंबिवली (पू.),
जि. ठाणे - ४२१ २०१ )
व
शुभ एनक्लेव्ह, गोपाल लेन, एम. जी. रोड, )
घाटकोपर (प.), मुंबई - ४०० ०८६ )
व
फ्लॅट क्र. २, पहिला मजला, शुभ आर्केड, गोपाल लेन, )
घाटकोपर (प.), मुंबई - ४०० ०८६. )
२. **श्री. दिलीप शाह ऊर्फ नागदा**
भारतीय नागरिक, पत्ता ४/४६, पाटील प्रसाद २ रा मजला, )
जीव्ही स्कीम रोड नं. २, मुलुंड (पू.), मुंबई - ४० ००८१) .... प्रतिवादी

सन्मा. पीठासीन अधिकाऱ्याद्वारे जारी मुळ अर्ज क्र. १८८/२०१० मधील वसुली प्रमाणपत्रानुसार **₹ २४,३५,६२५/- (रु. चोवीस लाख पस्तीस हजार सहाशे पंचवीस मात्र)** अधिक त्यावरील देय व्याज वशुल्काची रक्कम तुमच्याकडून देय आहे.
तुम्हाला निर्देश देण्यात येत आहे की त्यांनी सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सदर रकमेचा भरणा करावा अन्यथा कायद्यानुसार वसुली करण्यात येईल.
वरील रकमेबरोबरच, तुम्हाला खालील रकमेचाहीभरणा करावा लागेल :
अ) वसुली प्रमाणपत्रातील आदेशानुसार व्याज
ब) सदर सेवा बजावण्यासंदर्भात तसेच थकबाकीच्या रकमेच्या वसुलीसाठीची अन्य प्रक्रिया यांसाठी आलेला सर्व खर्च,अधिभार व व्यय.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०८.०५.२०१२
शिक्का
सही/-
**(बी.एस. साने)**
वसुली अधिकारी, डीआरटी-२,मुंबई.

**फॉर्म क्र. ५२,** **विनियमन ६०(११)**
**भारत सरकार,**
वित्त मंत्रालय व वित्तीय सेवा विभाग
**मुंबई कर्जवसुली न्यायाधिकण क्र. २**
५ वा मजला, सिंदिया हाऊस, एन.एम. मार्ग,
बॅलार्ड पीयर, मुंबई - ४०० ०३८. दूर. २२६६५४७३, फॅक्स २२६६५४७३
**वसुली अधिकारी, कर्जवसुली न्यायाधिकरण २**
**स्थावर मालमत्तेच्या जप्तीचे वॉरन्ट**
**वसुली प्रक्रिया क्र. १५२/२०११ एक्झिबिट क्र. १५**
**पुढील तारीख : ०८.०६.२०१२**

**कॅनरा बॅंक** ... अर्जदार/प्रमाणपत्रधारक
वि.
**श्री. विश्वनाथ एम. शेट्टी व अन्य** .... प्रतिवादी/प्रमाणपत्र ऋणको

ज्याअर्थी तुम्ही **१) श्री. विश्वनाथ एम. शेट्टी व२) श्री. कोटा भास्कर राव** (प्रमाणपत्र ऋणको) यांनी सन्मा. पीठासीन अधिकाऱ्यांद्वारे जारी मूळ अर्ज क्र. ३२/२००९ मधील वसुली प्रमाणपत्र क्र. १५२/२०११ च्या संदर्भात रक्कम ₹ ९, ५१, ४५९०० अधिक त्यावरील व्याजाच्या रकमेचा भरणा करण्यास कसूर केली आहे.

तुम्हाला पुढील आदेश मिळेपर्यंत खालील निर्देशित मालमत्तेच्या संदर्भात हस्तांतरण, करार, तिसऱ्या पक्षाचे हित निर्माण करणे, ताब्यामध्ये हिस्सा, अधिकार वा व्यवहार करण्यास मनाई करण्यात येत आहे व अशा हस्तांतरण, करार, ताबा वा अधिकाराअंतर्गत कोणत्याही प्रकारचे लाभ घेण्यास सर्व व्यक्तींना मनाई करण्यात आली आहे.

**स्थावर मालमत्तेचे विवरण**

गाव आचोळे, नालासोपारा (पू.), तालुका वसई, जि. ठाणे येथील प्लॉट क्र. ९ (बी), सर्व्हे क्र. १४९ (न्यू), १११ (ओल्ड) धारक बिल्डिंग एन.जे. रेसिडेन्सीमधील ३ ऱ्या मजल्यावरील अंदाजे ९०० चौ.फूट क्षेत्रफळाचा फ्लॅट क्र. ३०२ व ५०० चा.फूट क्षेत्रफळाचा फ्लॅट क्र. ३०१ हे गहाण फ्लॅट्स.

माझ्या सही व सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी दि. ०२ मे २०१२ रोजी जारी.

**सही/-**
**(बी.एस.साने)**
**वसुली अधिकारी**
**डीआरटी - २**

शिक्का

प्रति,
**१. श्री. विश्वनाथ एम. शेट्टी**
३११, सुंदरम बिल्डिंग को-ऑप. हाऊ. सोसा., सायन सर्कल, सायन (पू.), मुयंई - ४०० ०२२. आणि सदनिका क्र.३०१ व ३०२, ३ रा मजला, एन.जे. रेसिडन्सी, अचोले गाव मार्ग, नालासोपारा (पू.), जि. ठाणे- ४०१२०९
**२. श्री. कोटा भास्कर राव**
३३, ३ रा मजला, ए - १, परेरा जूचंद्र, अमोल नगर, नायगाव (पू.), जि. ठाणे

IDBI BANK
**नोंदणीकृत कार्यालय :** आयडीबीआय टॉवर, डब्ल्यूटीसी कॉम्प्लेक्स, कफ परेड, मुंबई - ४०० ००५
**दूर.** : ९१ २२ ६६५५३३५५, २२१८ ९१११, फॅएॅक्स : ९१ २२ २२१८०४११
**वेबसाइट :** www.idibi.com

**परिशिष्ट ४ (नियम ८ (१)**

**ताबा सूचना**
**(स्थावर व जंगम मालमत्तांकरिता)**

ज्याअर्थी, आयडीबीआय बॅंक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकाऱ्यांनी, सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (क्र. ५४/२००२) अंतर्गत व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ६ व ८ व सहवाचिता कलम १३ (१२) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये मे. नॅशनल फार्मास्युटिकल्स यांना दि. १२.११.२०११ नुसार रक्कम रु. २,१२,३७,७७६/- (रु. दोन कोटी बारा लाख सदतीस हजार सातशे शहात्तर मात्र) अधिक पुढील व्याजाच्या रकमेचे प्रदान सदर सूचना जारी झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती.
कर्जदारांनी सदर रक्कम भरणा करण्यास कसूर केली असल्याने सदरसूचना कर्जदार व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायद्याच्या नियम ६ व ८ सहवाचिता, सदर कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये दि. १०.०५.२०१२ रोजी (प्लॉट क्र. जी १८/१, एमआयडीसी, तारापूर इंडस्ट्रियल क्षेत्र, बोईसर, जि. ठाणे - ४०१५०६, महाराष्ट्र येथील मालमत्ता) खालील निर्देशित मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
विशेषत: कर्जदारांना व आम जनतेस सूचना इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये व असा कोणताही व्यवहार हा दि. १२ नोव्हेंबर २०११ पर्यंत गणना केलेल्या कर्ज रकमेशी संबंधित असेल ज्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :
रक्कम रुपयांत

| | |
|---|---|
| आयडीबीआय बॅंक लि. (आयडीबीआय) | **२,१२,३७,७७६/-*** |
| **एकूण** | **२,१२,३७,७७६/-*** |

* अधिक दि. १३ नोव्हेंबर २०११ पासून एकत्रित दराने अंतिम प्रदान व/वा तडजोडीच्या तारखेपर्यंतचे व्याज

**स्थावर व जंगम मालमत्तेचे वर्णन**

**अ) तारणगहाण मालमत्ता :** कर्जदारांची संपूर्ण वर्तमान मालमत्ता यामंध्ये कच्चा माल, प्रगतीपथावरील कामे, तयार वस्तू आदे तसेच नोंदीत कर्जे, खालील निर्देशित केल्यानुसार तसेच स्टोअरमध्ये सुटे असलेले व/वा आता असलेले वा संस्थेच्या सर्व फॅक्टरीमध्ये असलेले, जागा व दोगामे वा अन्य सर्व काही तत्सम एकत्रित वा संस्थेच्या मालकीच्या अन्य वस्तूंसमवेत वा संस्थेचे आदेश वा वितरण वा प्रवृत्तीनुसार अन्य तिसऱ्या पक्षाकडे असलेल्या जशा वा जेथे ही असलेल्या संस्थेच्या मालकीच्या पर्यायी वा समाविष्टतेसहित वस्तू.
**ब) गहाण मालमत्ता :** सरसवाली गावच्या हद्दीतील जिल्हा व नोंदणीकरण उपजिल्हा पालघरच्या हद्दीतील, महाराष्ट्र राज्यातील एमआयडीसी, तारापूर औद्योगिक क्षेत्र, बोईसर येथील प्लॉट क्र. जी १८/१, ज्याचे क्षेत्रफळ ७०५ चौ.मी. आहे, त्यावरील फॅक्टरी व इमारती व संरचनांसहित तसेच कर्जदारांची सर्व प्लान्ट व मशिनरीज तसेच सदर जमिनीवर असलेल्या सर्व वस्तू वा बाबी, ज्याच्या सीमा खालीलप्रमाणे :
**उत्तरेस वा त्या दिशेस :** रस्ता
**दक्षिणेस वा त्या दिशेस :** एमआयडीसी सीमा
**पूर्वेस वा त्या दिशेस :** प्लॉट क्र. जी - १७/८
**पश्चिमेस वा त्या दिशेस :** प्लॉट क्र. जी - १८/२

ठिकाण : ठाणे
दिनांक : १० मे २०१२
सही/-
प्राधिकृत अधिकारी
**आयडीबीआय बॅंक लि.**

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

## मधुर चवीचा अवीट गोडीचा आंबा

प्रत्येक ऋतूची वैशिष्ट्ये ठरलेली असतात. हवामानापासून ते पीक पाण्यापर्यंत इतकी विविधता आढळते की निसर्गाने आपल्या सौंदर्याबरोबर समस्त सृष्टीचे सौष्ठव म्हणजे आरोग्यसुद्धा जपले आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आहेत. वैशाख महिना म्हणजे कडक उन्हाळा असतो. वैशाख वणव्याचे चटके प्रखरपणे जाणवत असतात. उष्ण वारा आणि घामाच्या धारा अशा परिस्थितीने मनुष्याची घालमेल होत असते. परंतु अशा परिस्थितीतही काही सुखावह गोष्टीसुद्धा निसर्गानेच उपलब्ध करून दिलेल्या असतात. ज्याप्रमाणे उन्हाच्या कडाक्यापासून संरक्षण करण्याकरिता थंडगार वाळ्याचा किंवा चंदनाच्या उटीचा उपयोग सांगितलेला आहे. त्याचवेळेला थोडाकाळ का होईना परंतु मनाचा गोडवा जपणाऱ्या आंब्यासारखे राजर्षी फळही याच वैशाख महिन्यामध्ये आपल्या भेटीला येत असते. साधारणपणे फेब्रुवारी महिन्यापासूनच आंब्याची चाहूल लागायला लागते. आणि एप्रिल आणि मे चे दोन महिने आंब्याच्या महोत्सवाचेच दिवस मानले जातात. आंब्याचा गोडवा हा शब्दांनी कधीच वर्णन करता येणार नाही आणि म्हणूनच डेरेदार वृक्षाला येणारी अत्यंत चवदार फळे एक वेगळेच माधुर्य निर्माण करते. आंब्याचे हे महत्त्व मान्य करूनच त्याला फळांचा राजा म्हटले गेले आहे. सृष्टीचा हा एका अर्थी खरोखरच चमत्कार म्हटला पाहिजे. खरं तर आंबा हे तसे उष्ण फळ मानले जाते. वैशाख वणव्यातच चाखला जाणारा आंबा जरी उष्ण असला तरी मनाला तो हिवाळ्यापेक्षा जास्त आल्हाद देणारा ठरतो हे नाकारता येणार नाही. इतर कुठल्याही फळांची आपण इतक्या आतुरतेने वाट पाहात नाही तितकी आंब्याची पाहतो. जितक्या आवडीने आपण आंबा चाखतो किंवा त्याचे रसपान करतो तेवढे इतर कोणत्याही फळांच्या बाबतीत घडत नाही. आंब्याचा आकार, त्याचे विविध प्रकार, त्याचा रंग आणि त्याची चव या सगळ्याच गोष्टी या फळाचा रुबाबदारपणा वाढवणाऱ्याच आहेत. महाराष्ट्रामध्ये आंब्याचे भरपूर उत्पादन होते. कोकणचा परिसर हा तर हापूस आंब्यांसाठी जगप्रसिद्ध मानला जातो. तसे पाहिले तर कोकणातली जवळपास सगळीच फळे ही दरबारी किंवा देवफळे म्हटली पाहिजेत. नारळ, सुपारी, फणस, आंबा, काजू, रातांबे ही सगळीच उत्पादने कोकणाचे वैभव ठरतात. एखाद्या विशिष्ट भागामध्ये विशिष्ट फळे किंवा पिके भरमसाट प्रमाणात होतात ही गोष्ट सृष्टीने किंवा निसर्गाचा समतोल साधणारीच असतात.

### निसर्गाची मजेदार रचना

सध्या आंब्याचाच मोसम सुरू असल्यामुळे त्याच्या खरेदीसाठी बऱ्यापैकी झुंबड उडालेली दिसते. अगदी हापूस आंबा परवडत नसला तरी इतर जातीच्या आंब्यांची खरेदी करून केवळ दोन महिने उपलब्ध होणाऱ्या या आंब्याचा आस्वाद प्रत्येकजण हमखास घेत असतो. निसर्गाच्या या मजेदार रसनेचे काही वेळेला खरोखर आश्चर्य वाटते. या फळाचा इतिहासही खूप जुना आहे. आपल्या संपूर्ण भारतामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचा आंबा घेतला जातो. त्याच्या जवळपास दोनशे जाती असल्याचे सांगितले जाते. आंब्याच्या मोहराला 'आम्रमंजिरी' असाही एक शब्दप्रयोग वापरला जातो. वसंत ऋतूच्या आगमनाची सूचना देणारी आम्रमंजिरी कोकिळेलाही मोहित करते आणि म्हणूनच अगदी कालिदासाच्याही अनेक वाङ्मयांमध्ये निसर्ग वर्णन करताना आम्रमंजिरीचे उल्लेख आलेले आहेत. बृहदारण्यक, उपनिषद, रामायण, महाभारत, पतंजली किंवा चरक संहिता, सुश्रूत संहिता अशा अनेक ग्रंथांमध्ये आंब्याचे गुणगान वाचायला मिळते. आकर्षकता आणि अवीट गोडीने मोहित करणाऱ्या या फळाचे अनेक औषधी उपयोगही सांगितले गेले आहेत. निसर्ग हा कसा विविध पद्धतीने व्यक्त होतो आणि त्याची कोणतीच गोष्ट कशी टाकाऊ नाही हेही त्यानिमित्ताने लक्षात येते. आंबा हे उष्ण फळ आहे. त्याचा रस भरपूर खाल्ला तर तो वातकारक ठरतो. परंतु आंब्यांच्या साली काढून त्यात साखर मिसळून जो आणखी वेगळा रस तयार होतो तो वातशूळ थांबवणारा ठरतो. याच झाडाच्या मुळ्यांची राख काही द्रव्य वापरून जर अंगाला लावली तर अंगातली उष्णता कमी होते अशाप्रकारचा उल्लेखही अगदी कौटिल्य अर्थशास्त्रातही पाहायला मिळतो. असे म्हणतात की पूर्वीच्या काळी आपापल्या प्रदेशाची किंवा राज्याची सीमा दाखवण्याकरिता आंब्याची झाडे लावली जात असत. आंब्याचे झाड हे दीर्घजीवी आणि विशाल असल्यामुळे त्याचे लाकूडदेखील तितकेच टिकाऊ मानले जाते. अशा या गुणसंपन्न आंब्याला कोण बरे वश होणार नाही?

### माधुर्य निर्माण करणारे फळ

मनुष्यजीवनामध्ये सृष्टीचा हा सक्रिय सहभाग फार मोलाचा ठरलेला आहे. आपण केवळ आपल्या जिभेचे लाड पुरवण्याकरिता आंब्याचा रस चाखतो. परंतु ज्या आंब्यापासून आपण या समाधानाची ढेकर देतो ते हे फळ आपल्या कार्याला किंवा कर्मालाही प्रोत्साहन देणारे आहे. समाजजीवनामध्ये माधुर्य टिकायचे असेल तर या फळांकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. फळे ही केवळ शरीराचे पोषण करणारी नाहीत. तर ती मनाचीही काळजी घेत असतात. कोणतेही मंगल कार्य असेल तर आंब्याच्या पानांचे तोरण हमखासपणे लावले जाते. काही लग्नसमारंभांमध्ये वधुवरामध्ये आंबा 'शिंपडण्याची' परंपरा आहे. म्हणजेच आंब्याचे झाड काढून आंब्याच्या पानांनी त्यावर पाणी शिंपडतात त्यालाच आंबा 'शिंपणे' असे म्हटले जाते. आम्रफल हे गर्भप्रत मानले गेले आहे. कच्च्या कैरीपासून मुरंबा, साखरआंबा बनवला जातो. तर आंब्याच्या कोयीपासून तयार होणारे पीठ हे अनेक औषधांमध्ये वापरले जाते. थोडक्यात सांगायचे तर दरवर्षी न चुकता आपण ज्या आंब्याचा आस्वाद घेतो त्या आंब्याचा हा थोडासा संक्षिप्त आलेख आहे. आजच्या महागाईच्या दिवसात गरिबाला हापूस आंबा परवडत नाही पण तरीसुद्धा तो इतर आंबा खाऊन आपली तहान भागवत असतो. आंब्याचे महोत्सव भरवून व्यापार तर भरपूर होतो. परंतु मनाला आणि शरीराला गोडवा देणारे हे फळ समाजात माधुर्य टिकवण्याचा संस्कारही रुजवते. राजा हा प्रजेची काळजी घेतो किंवा प्रजेला सुख देतो. त्याप्रमाणेच फळांचा राजा असलेला आंबा तुमच्या आमच्या जिभेची अशीच काळजी घेत असावा.

### मुखशुद्धी

समोरून येणाऱ्या दोन स्त्रियांना पाहून एक मित्र आपल्या दुसऱ्या मित्राला म्हणाला, 'दोस्ता, मेलो, ठार झालो, समोरून माझी बायको आणि प्रेयसी दोघीही बरोबरच येत आहेत.'
त्याचा मित्र हैराण होऊन म्हणाला, 'कमाल आहे यार, मीच तुला ही गोष्ट सांगणार होतो.

### पंचांग

**सोमवार, १४ मे २०१२**
शके १९३४ नंदननामसंवत्सर,
* वैशाख कृष्ण नवमी ● नक्षत्र: शततारका
● रवी उदय ०६-०६, रवी अस्त १९-०४
जन्मराशी: ००-०१ ते २४-०० कुंभ

संपादक, मुद्रक, प्रकाशक व संचालक: **सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**
मुद्रक-प्रकाशन स्थळ : नवाकाळ प्रेस, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगाव, मुंबई -४००००४. टेलिफोन : २३८८०९८१,
जाहिरात विभाग: २३८६०९८७,२३८४१५२४, फॅक्स नं.: २३८१०१७६
वितरण: २३८२४४६६, फॅक्स नं. : २३८६ ०९८९, २३८७ ४९११.
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
info@navakal.org
http://navakal.org
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

### कविता

## झरा

*झुळझुळ वाहतो झरा*
*वाटे 'स्थितप्रज्ञ' खरा*
*निवान्त शांतात पसरली भोवताली*
*तो तयाची पर्वा न करी*
*वाहतो वरतून खाली*

*स्वत: कामात राहे 'बापुडा' मग्न*
*मार्गस्थ येती किती तरी विघ्न*
*निपटूनी तयासी धैर्याने*
*तो मार्ग आक्रमी त्वेषाने*

*जाणे आहे दूर-दूर का ध्येयाप्रत*
*मानवाच्या कल्याणासाठी अविरत*
*कोणी मानस्थस्त का जलप्राशन?*
*फुलले अवघे वृक्ष-पालवी-भू-मानव-जीवन*

– **श्री पोपटराव नारायण गायकवाड**
महाराष्ट्र हौसिंग बोर्ड
ओम सोसायटी, चाळ नं.२०/५८८,
दिंडोशीनगर, मालाड (पूर्व)

## शिवशक्ती कबड्डी संघाला दुहेरी मुकुट



मुंबई, रविवार -चिंचपोकळी येथील जय भवानी क्रीडा मंडळ आणि सुरेश व्यायामशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आचरेकर मैदानात आयोजित करण्यात आलेल्या मुंबई जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत परळच्या शिवशक्ती संघाने पुरुष आणि महिला गटाची विजेतेपदे पटकावली. दुहेरी मुकुटाच्या मान मिळविला. प्रथम श्रेणी पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात शिवशक्ती संघाने गोल्फादेवीचा मकरंद मसुरकरच्या दमदार खेळाच्या जोरावर १३-९ गुणांनी पराभव केला. शेवटच्या निर्णायक चढाईत मकरंदने ४ गडी टिपून आपल्या संघाला शानदार विजय मिळवून दिला. त्याना रोहित डकरेची छान साथ मिळाली. पराभूत संघाचे लक्ष्मण आणि प्रितेश चमकले. महिला गटाचे विजेतेपद मिळविताना शिवशक्ती संघाने महर्षी दयानंद स्पोर्टस् क्लबचा २४-२२ गुणांनी पराभव केला. ऋतुजा देऊलकर, तृप्ती चव्हाण शिवशक्तीच्या विजयाचे शिल्पकार होते. पराभूत संघातर्फे संजोवी आचरेकर, शीतल पोटे छान खेळले. विजेत्या शिवशक्ती पुरुष संघाला १५,००० रुपये तर महिला संघाला ११,००० रुपये रोख आणि आकर्षक चषक देऊन गौरवण्यात आले. प्रत्येकी १६ संघांना दोन्ही गटात प्रवेश देण्यात आला होता. डॉ. जगन्नाथराव हेगडे, नगरसेवक रमाकांत राहाटे, मनोहर इंदुलकर, मंगेश चिंदरकर, बालकृष्ण पांचाळ यांच्या उपस्थितीत स्पर्धेचा बक्षीस समारंभ संपन्न झाला. पुरस्कार विजेते खेळाडू- पुरुष सर्वोत्तम- मकरंद मसुरकर, पकड- प्रितेश चव्हाण, चढाई- लक्ष्मण, महिला- सर्वोत्तम- संजोली आचरेकर, चढाई-ऋतुजा देऊलकर, पकड-तृप्ती चव्हाण

## रिझवी कॉलेजचा जेतेपदाचा चौकार

मुंबई, रविवार -शिवाजीपार्क येथील एस.पी.ग्रुप- बंगाल क्लब क्रिकेट अॅकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आंतरकॉलेज क्रिकेट स्पर्धेत सलग चौथ्ये विजेतेपद मिळवून वांद्र येथील रिझवी कॉलेजने जेतेपदाचा शानदार चौकार ठोकला. अंतिम सामन्यात त्यांनी रूपारेल कॉलेजचा २४ धावांनी पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली. रिझवीतर्फे २०० धावांचे लक्ष्य रूपारेलसमोर ठेवण्यत आले. परंतु रूपारेलचा डाव १७५ धावांतच संपला. रिझवीतर्फे कुणाल दुबेने २८, सिद्धेश लाडने ४४, केविन अलमेडाने ४२, निल नार्वेकरने २५ धावा केल्या. निल नार्वेकर, यश चव्हाण यांनी प्रत्येकी ३ बळी घेतली. तर विनित धुळपला २ गडी मिळाले. पराभूत संघातर्फे सचिन यादवने ७२, पार्थने २५ धावा केल्या. निल नार्वेकरची सर्वोत्तम खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. अलाईड डिजिटल स्पोटस् फाऊंडेशन स्पर्धा पुरस्कृत केली होती. पुरस्कार विजेते खेळाडू- सर्वोत्तम फलंदाज अजिंक्य पाटील, गोलंदात प्रसाद रहाटे, अष्टपैलू निल नार्वेकर, प्रशिक्षक भीमेश शहा.

## सिंधूला रौप्यपदक

नवी दिल्ली, ता.१३ - डच खुल्या आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत भारताची राष्ट्रीय विजेती पी.व्ही. सिंधूला अखेर रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. यजमान हॉलंडच्या जी.ए.याव्होने सिंधूला सरळ दोन गेममध्ये पराभूत केले. याव्होला या स्पर्धेत दुसरे मानांकन देण्यात आले होते. तर सिंधू मात्र मानांकनापासून वंचित होती. उपांत्य फेरीत सिंधूने प्रथम मानांकन देण्यात आलेल्या बूसराना पराभूत करून स्पर्धेत खळबळ माजविली होती.

## आशाला तीन सुवर्ण

कोलकाता, ता.१३- येथे नुकत्याच संपन्न झालेल्या वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय अॅथलेटिक्स स्पर्धेत यजमान प.बंगालच्या आशा रॉयने ३ सुवर्णपदक जिंकून नवा इतिहास रचला. या स्पर्धेत तिने १०० व २०० मीटरच्या दोन्ही शर्यती जिंकल्या. तसेच १०० मीटर रिले शर्यतीत आपल्या बंगाल संघाला सुवर्णपदक जिंकून दिले. या स्पर्धेत १०० व २०० मीटर शर्यती जिंकणारी रॉय ही प.बंगालची पहिली धावपटू ठरलेय. रॉय ही अत्यंत गरिब घराण्यातून असून तिचे वडील भाजीविक्रेते आहेत.

## क्षितिज कानडेचे दमदार शतक
## साळगावकर २६१ धावांनी विजयी

ठाणे, ता.१३- स्पोर्टिंग क्लब कमिटी, ठाणे यांच्या विद्यमाने येथील सेंट्रल मैदानावरील अर्जुन बाळा मढवी जिमखान्यावर सुरू असलेल्या २६व्या डॉ.श्रीधर देशपांडे स्मृती वासंतिक साखळी क्रिकेट स्पर्धेच्या 'ड' गटात साळगावकर स्पोर्टिंग क्लबच्या क्षितीज कानडेने चमकदार शतक (११५) झळकविले, तर या सामन्यात साळगावकरने ग्लास क्रिकेट क्लबचा दणदणीत २६१ धावांनी विजय संपादित करून ४ गुणांची कमाई केली. 'ड'गटात श्री आनंद भारती समाजाने ठाणे कोल्टस्चा पराभव केला. श्री आनंद भारतीतर्फे नितिनने नाबाद ३४, सम्राट नाखवाने ३४, कुणाल वरळीकरने ३४, हेरंब कोळीने ३१ धावा केल्या. सम्राट नाखवाने अष्टपैलू खेळ करताना २ बळीदेखील घेतले. ठाणे कोल्टसच्या इशांत धुमाळने ४ बळी घेतले. 'ड' गटात इंदप क्लबने रॉलय क्लबचा पराभव केला. इंदपतर्फे मिहीर प्रभूने ३३, रमेश भिंगरेने नाबाद ५४ धावा केल्या. तर रॉलयतर्फे मंदारने ४४, भावेशने ३८, अजयने ३१ धावा केल्या. चेतनने ४ बळी घेतले.

## जयवंत मोरे, प्रगती चव्हाण विजेते

ठाणे, ता.१३- येथील उपभोक्ता ग्राहक संरक्षण सेवा समिती आणि ठाणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ठाणे जिल्हा गुणांकन कॅरम स्पर्धेत जयवंत मोरेने पुरुष एकेरी आणि प्रगती चव्हाणने महिला एकेरीत जेतेपद पटकावले. पुरुष गटात मोरेने अंतिम फेरीत हरिष जैनचा २५-१२, ०-२५, २५-१२ असा तीन डावांत पराभव केला. तर महिलांचे जेतेपद पटकाविताना प्रगती चव्हाणने वीणा चव्हाणचा २५-२, १६-१७, २५-११ असा तीन डावांत पराभव केला. २००पेक्षा जास्त खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. जयवंतला १० हजार, तर प्रगतीला ४ हजार रुपये रोख, चषक देऊन गौरविण्यात आले.

## हरियाणाला दुहेरी मुकुट

पणजी, ता.१३- येथे झालेल्या सब ज्युनियर राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेत हरियाणा संघाने दुहेरी मुकुटाचा मान मिळविला. मुलांच्या गटांत हरियाणाने चंदीगडचा ५३-२१ गुणांनी पराभव केला. तर मुलींच्या गटांत त्यांनी मिझोरामला ४८-३७ गुणांनी नमविले.

## तिरोडकर संघाला विजेतपद



मुंबई, रविवार - चार वर्षांनंतर परत यंदा घेण्यात आलेल्या भंडारी ढाल क्रिकेट स्पर्धेत तिरोडकर संघाने बाजी मारली. निर्णायक लढतीत तिरोडकर संघाने मांजरेकर संघाचा ६ गडी राखून सहज पराभव केला. विजयासाठी १८९ धावांची गरज तिरोडकर संघाला होती. त्या अगोदर मांजरेकर संघाने १८८ धावा केल्या होत्या. देवेंद्र मयेकरने ६८ आणि कौस्तुभ कोळंबकरने ६० धावा केल्या. शिवाजी पार्क जिमखान्याच्या मैदानावर झालेल्या निर्णायक लढतीत विजेत्या संघाला दहा हजार व उपविजेत्या संघाला ५ हजार रुपये रोख, चषक भेट देण्यात आला. उद्योगपती झुनझुनवाला, माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच माधव गोठस्कर, क्रिकेटपटू दया दुधवडकर, प्रकाश वस्त उपस्थित होते. झुनझुनवाला यांनी ५१ हजार रुपयांचा चेक सचिव अरविंद शिरसेकर यांच्याकडे सुपूर्द केला.

### IPL आजचे सामने

दु. ४.०० वाजता
**मुंबई इंडियन्स** विरुद्ध **रॉयल चॅलेंजर्स**
◆ठिकाण◆
एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळूर
रात्री ८.०० वाजता
**कोलकत्ता नाईट रायडर्स** विरुद्ध **चेन्नई सुपर किंग्ज**
◆ठिकाण◆
इडन गार्डन कोलकत्ता

## शास्त्रज्ञांचे मन:पूर्वक अभिनंदन

### मनोगत

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे हिंदुस्थान बडे राष्ट्र होण्याचे स्वप्न हे अग्नी-५ हे क्षेपणास्त्र तयार करून शास्त्रज्ञांनी प्रत्यक्षात आणले, त्याबद्दल शास्त्रज्ञांचे मन:पूर्वक अभिनंदन

कोणते राष्ट्र बडे ठरते, या भाषणात स्वा. सावरकर सांगतात, जी राष्ट्रे शस्त्रबळाने सज्ज आहेत, ज्यांच्यापाशी क्षेपणास्त्र, अण्वस्त्रे आहेत, ती राष्ट्रे बडी ठरतात. आपणाकडे शस्त्र आहेत, म्हणून उठसूट कोणाला मारत सुटायचे नाही, पण जर कोणी आपल्या राष्ट्रावर अत्याचार करू लागला तर त्याला प्रत्युत्तर म्हणून आपल्याकडे शस्त्रे असायला हवीत. तुम्ही साऱ्या देशावर लाख कारखाने उभारले, शाळा काढल्या आणि तुमच्या शत्रूला आक्रमणापासून संरक्षण करणाऱ्या भूतलाचे, नौदलाचे नि विमानदलाचे सवाई शस्त्रबळ तुमच्यापाशी नसेल तर त्या सर्व संपत्तीची लुटालुट करतील, म्हणून शस्त्रसज्ज असणे महत्त्वाचे आहे. हिंदुस्थानात पाच बलवान राष्ट्रांच्या पंक्तीत, ही बातमी वाचून फार समाधान वाटले. विज्ञाननिष्ठेची आणि शस्त्रबळाची कास धरल्यामुळेच हे शक्य झाले.

**शीला रानडे,**
**मुंबई**




नवाकाळ

मुंबई, सोमवार १४ मे, २०१२ पान - ८




# कल्याणचे योगतज्ज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांच्याकडून चाऱ्यासाठी ६० हजाराची मदत



मुंबई, रविवार – 'नवाकाळ'ने चाऱ्याविना तडफडणाऱ्या जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्यासाठी मदतीचे आवाहन केले होते. या आवाहनाला वाचकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कल्याण पारनाका येथे राहणारे योगतज्ज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन आणि सौ. प्रमिलादेवी यांनी ६० हजार रुपयांची मदत केली आहे. त्यांच्या या मदतीतून आणि आशीर्वादातून तडफडणाऱ्या जनावरांना जीवदान मिळणार आहे.

गेली साठ वर्षे अविरत आध्यात्मिक मार्गदर्शनासोबत लोककल्याणासाठी झटणारे योगतज्ज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांनी कामाचा एक आदर्शच घालून दिला आहे. कोणत्याही संकटा वेळी आपल्या शिष्यांसोबत ते मदतीला पुढे असतात. देश-विदेशात आज त्यांचे भक्त आहेत. त्यांच्याकडून अर्पण केलेला धनाचा विनियोग ते समाज कल्याणासाठी करीत असतात. सामाजिक संस्था, अपंग संस्था, अंध संस्था, निराधार संस्था, मूकबधिर, अनाथ विद्यालये आणि आश्रम आदींना ते सतत मदतीचा हात देत असतात. हरिद्वारापासून कन्याकुमारीपर्यंत विविध संस्थांना त्यांनी आजवर मदत केली आहे. अंधअपंगांना वैयक्तिक देणग्यासोबत भोजनप्रसादाचेही वाटप केले जाते.


सौ. प्रमिलादेवी

कल्याण पारनाका येथे राहणाऱ्या प.पू. दादाजी वैशंपायन यांना आजवर विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

पुण्याच्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टतर्फे गुरूमहात्म्य पुरस्कार मा. मनोहर जोशी यांच्या हस्ते देण्यात आला. उद्योगपती डीएसके ट्रस्टतर्फे सुधीरभाऊ जोशी यांच्या हस्ते गुरुदत्त पुरस्कार प्रदान करण्यात आला. गगनागिरी महाराज ट्रस्टतर्फे गजानन कीर्तिकर यांच्या हस्ते कर्मयोगी पुरस्कार, साधक समूहातर्फे गुरुगौरव पुरस्कार न्या. राजाभाऊ गवांदे आणि कुलसचिव श्री प्रधान यांच्या हस्ते देण्यात आला. शिवाय शिखर प्रकाशनातर्फे योगतज्ज्ञ पुरस्कार, अमेरिकेतील साधकांतर्फे रिंगमास्टर पुरस्कार, नाशिकच्या सद्‌गुरू प्रतिष्ठानचा सत्कर्म सेवा पुरस्कार गुरुदत्त सामाजिक संस्थेच्या वतीने अतिथी गौरव पुरस्कार, उद्योगपती फडणीस फाऊंडेशन तर्फे रिध्दिसिद्दी पुरस्कार देण्यात आला आहे. शिवाय २००१ साली भक्तगणांनी कृतज्ञता सोहळाही आयोजिला होता.

# वाडा तालुक्यातून पाच नद्या वाहात असताना आदिवासी दुष्काळात

वाडा, ता. १३ – ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यातून एक-दोन नाही तर तब्बल पाच नद्या वाहात असतानादेखील या तालुक्यातील आदिवासींना पाण्यासाठी वणवण हिंडावे लागते. यातील वैतरणा या प्रमुख नदीवरील पाणी अडवून कोका कोला सारख्या बलाढ्य कंपनीला लाखो लिटर पाणीपुरवठा होऊ शकतो. मात्र, याच परिसरातील अनेक गावांना व पाड्यांना या नदीचे पाणी मुबलक प्रमाणात मिळू शकत नाही ही अत्यंत शरमेची बाब आहे. या बारमाही वाहणाऱ्या नद्यांचा व शासनाच्या पाणीपुरवठ्या बाबतीतील विविध धोरणांचा आम्हाला उपयोग तो काय? असा प्रश्न येथील तहानलेल्या आदिवासींनी विचारला आहे.

राज्यभर पाणीटंचाईचे संकट असताना वैतरणा, गारगाई, पिंजाळ, तानसा व देहर्जे या पाच बारमाही पाणी असणाऱ्या नद्यांची देणगी निसर्गाने वाड्यासारख्या आदिवासी भागाला दिली असतानादेखील शासनाच्या उदासीन धोरणांमुळे व स्थानिक आमदार, खासदार व सत्ताधाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे येथील सुमारे १६५ गावे व पाड्यांतील आदिवासींच्या गळ्याला जवळपास २० वर्षांपासून कोरड कायम आहे. याची अनेक कारणे व व्यथा कित्येक वेळा विविध कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी कधी लेखी, तोंडी तर कधी आंदोलनाच्या स्वरूपात शासनासमोर मांडली आहेत. मात्र फक्त थातूर-मातूर उत्तरांनी व पोकळ आश्वासनांनी शासनाच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी त्यांच्या तोंडाला पाने पुसण्याव्यक्तिरिक्त काही ठोस उपाय आजपर्यंत केलेला दिसत नाही.

शासनाने आजपर्यंत अनेक पाणीपुरवठ्यांच्या योजना, जलस्वराज्य प्रकल्प, लहान मोठे बंधारे, बोअरवेल, सिंचन तलाव, विहिरी यांसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला आहे. मात्र जर शासनाच्या अधिकाऱ्यांनी व पदाधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयातून बाहेर निघून वाडे तालुक्यातील आवंढे, मांडवा, काटी, खोदडा, हमरापूर, साखरशेत, बालशेतपाडा, आलमान अशा अनेक गावांना व पाड्यांना भेट देवून प्रत्यक्षात पाहणी केली तर, हा खर्च किती फोल ठरला आहे? याचा प्रत्यय येईल.

## मुंबईतील बसस्टॉप होणार दुबईसारखे वातानुकूलित

मुंबई, रविवार – मुंबईतील बसथांबे (बसस्टॉप) आता दुबई शहरातील बस थांब्याप्रमाणे वातानुकुलीत (एअर कंडशन्ड) होणार आहेत. सुरुवातीला ४० बसस्टॉप वातानुकूलित बनविले जाती. आता घामाघूम होईपर्यंत येणाऱ्या बसची वाट पाहावी लागणार नाही.

हे वातानुकुलित बसस्टॉप तयार करण्यासाठी बेस्टला अजिबात खर्च करावा लागणार नाही. खाजगी कंपनी हे वातानुकुलीत बस स्टॉप बांधून देणार आहे. या वातानुकूलित बसस्टॉपमध्ये येणाऱ्या बसचा क्रमांक दाखविणारा इंडिकेटर असणार आहे. एवढेच नव्हे तर या बसस्टॉपमध्ये एटीएम मशीन असणार आहे. या वातानुकूलित बस स्टाॅपचे रक्षण करण्यासाठी २४ तास सुरक्षा रक्षक असणार आहे.

# महामानव डॉ. आंबेडकर यांच्या कार्टुनबाबत सुनील कदम संतप्त

(पान १ वरून चालू)

एखाद्या कार्टुनमधून वेगवेगळे अर्थ निघू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी अर्धवट माहितीसह असे आक्षेपार्ह कार्टुन छापणे योग्य नाही. हे कार्टुन या श्रमिक पुस्तकातून वगळलेच पाहिजे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या कार्टुनचा निषेध करताना आंबेडकरी जनतेने पुण्यातील डॉ. सुहास पळशीकर यांचे कार्यालय फोडले. याचा निषेध काही बुद्धिमंत करीत आहेत.

यावर संतप्त प्रतिक्रिया देताना सुनील कदम म्हणाले की, हे क्रमिक पुस्तक वाचून काही विद्यार्थ्यांनी गेल्या मार्च महिन्यातच आक्षेप घेतला होता. रिपब्लिकन पक्षाचे नेते रामदास आठवले यांनी एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला पत्रकार परिषद घेऊन हे कार्टुन वगळण्याची मागणी केली.

कपिल सिब्बल यांच्यापासून अनेक केंद्रिय मंत्र्यांना निवेदन पाठविले. नुकत्याच झालेल्या अधिवेशनात भाजपाने हा प्रश्न उपस्थित केला. पण कुणी लक्ष द्यायला तयार नव्हते. मग करायचे काय? मी तोडफोडीचे समर्थन करीत नाही. पण जनतेच्या भावनांकडे राजकारणी लक्ष देत नाहीत. मग जनतेकडे कोणता मार्ग राहतो.

खैरलांजी हत्याकांड झाले तेव्हाही कुणी लक्ष दिले नाही. अखेर सर्व प्रवाशांना खाली उतरवून डेक्कन क्वीन जाळली तेव्हा राजकारणी जागे झाले. हे लक्षात घ्या. कालच्या हल्ल्यावेळीही डॉ. पळशीकर तिथेच होते. पण त्यांच्या केसालाही कुणी हात लावला नाही. दुर्दैव असे की, मारहाण, तोडफोड केल्याशिवाय कोणत्याही प्रश्नाकडे राजकारणी लक्षच देत नाहीत. मार्चपासून कार्टुनला आक्षेप घेतला जात होता, पण कुणी लक्ष द्यायला तयार नाही. त्यातून हा नैसर्गिक उद्रेक होते हे समजून घ्यायला हवे.

मला इतकेच म्हणायचे आहे की, मोठ्या व्यक्तीमत्त्वांची निंदानालस्ती आता थांबली पाहिजे.

**– सुनील कदम**
९९३०९३३४९२

# पांजरापोळ प्रकल्पग्रस्तांची ३० कुटुंबे प्रखर उन्हात रस्त्यावर



(पान १ वरून चालू)

झोपडीधारकांनी विभागीय कोकण आयुक्तांकडे न्याय मिळविण्यासाठी धाव घेतली आहे. पण त्यांचाही प्रश्न प्रलंबित आहे. त्याचप्रमाणे पांजरापोळ गौतमनगरमधील एक्स ग्रुपमधील ३० व बी ग्रूपमधील ३० झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले. परंतु त्यांचे कुठेही पुनर्वसन केलेले नाही. मागील २० दिवसांपूर्वी बी ग्रूपमधील ३० झोपड्या एमएमआरडीएने बुलडोझर लावून तोडल्या. त्यावेळी तिथल्या झोपडीधारकांनी प्रखर विरोध केला. आधी पुनर्वसन करा, मग झोपड्या तोडा, असा टाहो फोडून इथले नागरिक निष्कासन पथकातील अधिकाऱ्यांसमोर अक्षरशः लोटांगण घालीत होते. परंतु कुणाच्याही कानापर्यंत त्यांचा टाहो पोहोचत नव्हता. शेवटी शाईन शेख नावाची एक महिला तिथल्या झाडावर चढली आणि झाडावरून उडी मारून आत्महत्या करू लागली.

त्यामुळे प्रशासनाची तारांबळ उडाली. शेवटी पथकातील अधिकाऱ्यांनी येत्या दोन दिवसांत सर्वांचे पुनर्वसन करण्याचे लेखी आश्वासन दिले. आणि झोपडीधारकांच्या संमतीने कारवाईला सुरूवात केली. मात्र आतापर्यंत २० दिवस उलटून गेले तरी या झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले नाही.

### आणखी ९०० झोपड्यांवर बुलडोझर फिरविणार!



पांजरापोळ नागरिक एकता समितीचे संस्थापक अध्यक्ष लाजरस ठोंबे हे 'नवाकाळ'शी बोलताना म्हणाले की, आमच्या एकजुटीमुळे ३२५० झोपडीधारकांचे कसे-बसे पुनर्वसन झाले. मात्र त्यांनाही आजपर्यंत एमएमआरडीएने मूलभूत सुविधा पुरविलेल्या नाहीत. शाळा, भाजीमंडई, हॉस्पिटल, गार्डन, समाजमंदिर, धार्मिक स्थळे, पार्किंग अशा कोणतीही सोय नसलेल्या इमारतीत त्यांना घरे दिली आहेत. मात्र उर्वरित शेकडो झोपड्यांच्या पुनर्वनाबाबत एमएमआरडीए चालढकल करीत आहे. विशेष म्हणजे या प्रकल्पात बाधित होणाऱ्या आणखी ९०० झोपड्यांवर एमएमआरडीएचा बुलडोझर फिरणार आहे.

सध्या या झोपड्या या इथल्या प्रकल्पातील बोगद्याच्या सुरूंग कामामुळे हादरत आहेत. अनेकांच्या घरांना भेगा पडल्या आहेत. तरी आतापर्यंत निष्कासीत केलेल्या आणि भविष्यकाळात निष्कासित होणाऱ्या सर्व झोपड्यांचे तत्काळ पुनर्वसन करावे, या मागणीसाठी आम्ही आमचा लढा चालू ठेवणार आहे. असा निर्धार लाजरस ठोंबे यांनी बोलताना व्यक्त केला.

# साईबाबांना १४ लाखाचा सुवर्णहिरेजडित मुकुट अर्पण



शिर्डी, ता. १३ – जगप्रसिद्ध शिर्डीचे साईबाबा मंदिर दिवसेंदिवस श्रीमंत बनत चालले आहे. भाविकांकडून मौल्यवान वस्तू बाबांना अर्पण केल्या जात आहेत. एका भाविकाने नुकताच सुमारे साडेचौदा लाख रुपये किमतीचा सुवर्णहिरेजडित मुकुट अर्पण केला. ५७० ग्रॅम सोन्याच्या या मुकुटावर पूर्णपणे हिरे मढविले आहेत.

# टीएमटीसाठी आमदार एकनाथ शिंदेही सरसावले

(पान १ वरून चालू)

एकनाथ शिंदे यांनी कृती समितीला दिले. तसेच या विषयावर येत्या मंगळवारी महापालिका आयुक्तांची भेट घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, परिवहन सेवेत चांगली कामगिरी करणारे महापालिकेचे सहाय्यक आयुक्त अशोक बुरपुल्ले यांना पुन्हा टीएमटीमध्ये आणण्यासाठी टीएमटी बचाव कृती समितीने लढा सुरू करण्याची हाक दिली आहे. डबघाईला गेलेल्या ठाणे परिवहन सेवेला पुन्हा नवसंजीवनी देण्यासाठी 'नवाकाळ'ने पुढाकार घेतला आहे. त्या माध्यमातून टीएमटी बचाव कृती समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीने कामगारांबरोबरच महापालिका आयुक्त तसेच महापौरांसह सर्व पालिका पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन परिवहन सेवेला वाचवा, असे साकडे घातले आहे. आज टीएमटी बचाव कृती समितीने शिवसेना ठाणे जिल्हासंपर्कप्रमुख आमदार एकनाथ शिंदे यांची टेंबीनाका येथील आनंद आश्रम येथे भेट घेतली. या बैठकीला महापौर हरिश्चंद्र पाटील, सभागृह नेते नरेश म्हस्के, 'नवाकाळ' संपादक सौ. जयश्री खाडिलकर-पांडे, नगरसेवक काशिनाथ राऊत, गिरीष राजे, बबन मोरे आणि कृती समितीचे सदस्य उपस्थित होते. एक तास चाललेल्या बैठकीत सर्वच पदाधिकाऱ्यांनी टीएमटीला वाचवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. टीएमटीमध्ये नादुरुस्त बसेस आहेत, त्या त्वरित रस्त्यावर आणणे, स्वेअर पार्ट वेळेवर उपलब्ध होणे आणि महापालिकेकडून मिळणाऱ्या अनुदानात वाढ करून मिळणे, अशा मागण्या कृती समितीने आमदार एकनाथ शिंदे यांच्याकडे केल्या. टीएमटीला सक्षम करण्यासाठी 'नवाकाळ' आणि कृती समितीच्या लढ्याचे कौतुक करून आपण सर्वांनी मिळून ही सेवा चांगली करण्यासाठी कामाला लागू या. असे मत आमदार शिंदे यांनी व्यक्त केले. मागील महिन्यातच परिवहन सेवेबाबत महापालिका आयुक्तांबरोबर बैठक घेऊन परिवहनला १८ कोटींऐवजी २४ कोटी रुपयांचा निधी द्या, अशी मागणी करण्यात आली आहे. तर ओवळा येथील आगाराचे खाजगीकरणाच्या माध्यमातून बांधणी करून परिवहनला निधी उपलब्ध करून देणे, अशी मागणी केल्याचे आमदार शिंदे म्हणाले. परिवहनला जिवंत ठेवण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. सुरुवातीला ३० नादुरुस्त बसेस महिन्याभरात रस्त्यावर आणण्याचे प्रशासनाने जाहिर केले असले तरी एखाद्या खासगी संस्थेला काम देऊन सर्व नादुरुस्त १०० बसेस महिन्याभरात रस्त्यावर आणण्याचा विचार सुरू असल्याचे आमदार शिंदे म्हणाले. या परिवहन सेवेला चांगल्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे. त्यामुळे एक चांगला सल्लागार, ऑटोमोबाईल इंजिनिअर आणि चांगला भांडारपाल आदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे गरजेचे आहे. अशी मागणी आम्ही ठाणे महापालिका प्रशासनाकडे करणार असल्याचे आमदार शिंदे म्हणाले. तर एखाद्या संस्थेला काम देऊन परिवहन सेवा कशी सक्षम होईल याचा आराखडा तयार करण्याचे सांगितले जाईल. जेणेकरून परिवहन सेवेला काय कमी पडते, आणि कुठे नियोजन अडकते याची माहिती मिळेल, असे मत सभागृह नेते नरेश म्हस्के यांनी व्यक्त केले. या बैठकीमध्ये सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी परिवहन व्यवस्थापक दीपक चव्हाण यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. व्यवस्थापक चव्हाण यांना जर परिवहनमध्ये राहायचे नसेल तर आयुक्तांनी महापालिकेचे सहाय्यक आयुक्त अशोक बुरपुल्ले यांची परिवहन व्यवस्थेमध्ये तातडीने नियुक्ती करावी, अशीही मागणी या बैठकीत करण्यात आली.

## तृतीय स्मृतीदिन



**कालकथित द्रौपदी दयाराम जाधव**

**मृत्यू दिनांक:१४/०५/२००९**

आठवणीचे पाझर फुटती, नयना मधुनी बरसे पाणी
सहवासाची अवीट गोडी,
अर्ध्यावरती संसाराचा डाव सोडून गेली
तुझ्या प्रितीचा सुगंध मनी हा दरवळतो
म्हणून तुझ प्रति वाहतो भावांजली

*** विनित ***

दयाराम बारकू जाधव:**पती**,
मिलिंद/प्रेमेंद्र/अनिल-**मुले**,
आरती/अंजली-**सुना**, मीना दयानंद भालेराव- **मुलगी**, जयेश/आकाश/साक्षी-नातवंडे, **संपर्क**: ९९८७३९६५१७

# कुडाळच्या निळेली धरणाच्या बंदराचे काम रखडले!

सिंधुदुर्ग, ता. १३ – दक्षिण पाटबंधारे विभागांतर्गत कुडाळ तालुक्यातील निळेली येथील धरण बंधराच्या दुरुस्तीचे काम हे शासन व ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे रखडले असून त्यामुळे शेतकरी व बागायतदार मधून संताप व्यक्त होत आहे. कुडाळ तालुक्यातील निळेली, मोरे, केरवडे, वाडोस या गावांसाठी ३० वर्षांपूर्वी निळेली येथे धरण उभारण्यात आले. त्यामुळे या तीस वर्षांमध्ये या परिसरातील लोकांनी मोठ्याप्रमाणात बागायती फुलविल्या आहेत. तसेच या परिसरातील शेतकरी धरणाच्या पाण्याचा वापर करून उन्हाळी भातशेती व पालेभाज्या भुईमूग पिकवित होते. तर नोकरीच्या पाठी न लगता 'जेरबेरी' प्रकल्प फुलविला आहे. तर काही तरुणवर्गाने नारळ, केळी, सुपारी या फळबागायती फुलविल्या आहेत. दोन वर्षे धिम्यागतीने चाललेल्या कामामुळे ठेकेदारांनी केलेल्या खोदाईची माती शेतात जाऊन लाभक्षेत्रातील जवळपास ४० शेतकऱ्यांची ३५ एकर शेती खराब झाली आहे. याचा मोबदला शेतकऱ्यांना अद्याप दिलेला नाही. याच निळेली धरणाचे पाणी माणगाव पंचक्रोशीतील १२ वाड्यांना नळ पाणीयोजना चालू करून पाणी पुरविले जात होते. ती नळ पाणीयोजनासुद्धा गेली दोन वर्षे या दुरुस्तीच्या कामामुळे बंद आहे. त्यामुळे माणगाव गावाला पाणीटंचाईला समोरे जावे लागत आहे.

# शिवसेनाप्रमुख रुग्णालयात दाखल

मुंबई, रविवार – शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना काल रात्री नियमित वैद्यकीय चाचणीसाठी लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती उत्तम असून त्यांना आणखी दोन दिवस चाचण्यांसाठी देखरेखीखाली ठेवले जाणार आहे, अशी माहिती लीलावती रुग्णालयाचे डॉक्टर जलील पारकर यांनी दिली.

